# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ३१.०८.२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०८) इतिवृत्त**

बुधवार दिनांक ३१ ऑगष्ट २००५ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशिनाथ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे दुपारी १२.३० वाजता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. कावडे साहेबराव राणुबा
(०२) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०३) श्री. गवळी रविकान्त काशीनाथ
(०४) श्री. जगीरदार अजेजमुख्तार अहमद
(०५) सौ.जधव संगिता विठ्ठलराव
(०६) सौ.दलाल लता श्रीनिवास
(०७) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०८) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(०९) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(१०) श्री. बारवाल गजनन रामकिशन
(११) श्री. विसपुते शशांक दामोधर
(१२) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत

<u>संवाद :</u>

सौ.लता दलाल : आजच्या बैठकीस मा.आयुक्त, उप आयुक्त व इतरही काही अधिकारी दिसत नाहीत काय कारण आहे? जे अधिकारी अनुपस्थित आहेत त्यांचेवर कार्यवाही करावी.

मा. सभापती : जे अधिकारी सभेला उपस्थित नाहीत त्यांची नोंद घ्यावी. मुख्य लेखाधिकारी यांनी प्रशासनाच्या वतीने आजच्या सभेचे कामकाज पहावे. स.सदस्यांनी चर्चेला सुरूवात करावी.

सौ. लता दलाल : माजी मंत्री श्री.हरिभाऊ बागडे यांच्या पत्नी स्व.द्वारकाबाई बागडे, नामवंत नाट्यकर्मी डॉ.आलोक चौधरी, मनपाचे करमुल्य निर्धारक व संकलक श्री.कमलाकर फड यांच्या पत्नी स्व.सिंधुताई फड आणि काँग्रेसचे माजी शहर अध्यक्ष पै.इद्रीसखान यांचे दु:खद निधी झालेले आहे. या सर्वांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री.गजनन बारवाल : यास माझे अनुमोदन आहे.
श्री.अजिजजहागिरदार

मा. सभापती : सर्वांनी श्रध्दांजलीसाठी उभे राहावे.
(यावेळी स्व.द्वारकाबाई बागडे, स्व.डॉ.अलोक चौधरी, स्व.सिंधुताई फड व पै.इद्रीस खान यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

मा. सभापती : श्रध्दांजली अर्पण केल्याबाबत संबंधीतांचे कुटुंबियांना सभागृहातर्फे शोकसंदेश कळविण्यात यावा.

श्री.गजनन बारवाल : मनपा हद्दीत ज्ञानेश्वरनगर भागात माझ्या मालकीचा एक प्लॉट असून त्यात खड्डा करून तेथे नाला असल्याचे समजण्यात आले होते. या प्लॉटला एक महिन्यापासून परवानगी मिळत नव्हती. या संदर्भात मीआपणाशी चर्चा केली, संबंधीत अधिकाऱ्यांना बोललो परंतु बांधकाम परवानगी मिळत नाही याचे कारण काय? नागरीकांनी परवानगीसाठी यायचे की नाही असा प्रश्न येतो. याची दखल घेऊन खुलासा घेण्यात यावा.

मा. सभापती : या संदर्भात त्या सोसायटीचे पदाधिकारी तसेच स.सदस्य श्री.बारवाले यांनी माझ्याकडे निवेदन सादर केलेले होते. प्रभाग समिती सभापती सौ.कोंडेकर यांनीही निवेदन दिलेले आहे. नाल्याच्या पाण्याचा प्रवाह योग्य प्रकारे वळण न काढल्यामुळे आजुबाजूच्या रहिवाशांना त्रास होत आहे. मी स्वत: पाहणी केली. सहा.संचालक नगर रचना यांचेसह चर्चा केली. ज्या बाजुने नाला प्रवाह काढावयाचा त्या बाजूच्या प्लॉट धारकाकडून काही प्रमाणात पैसे वसूल केलेले आहे. मा.आयुक्तांनी देखील पाहणी केली आहे. ही चर्चा एक महिन्यापुर्वी सभागृहात झालेली होती. स.सदस्यांनी व्यक्त केलेली भावना बरोबर असून संबंधीत अधिकारी श्री.राठोड हे मा.राज्यमंत्र्यांकडे सुनावणीसाठी गेलेले असल्याने आजसभागृहात नाहीत. त्या विभागाचे उप अभियंता श्री.वझे रजेवर आहेत. रितसर परवानगी देण्यात आलेली आहे. शहर अभियंता यांना महत्वाचे कामामुळे परवानगी दिलेली आहे. मुख्य लेखा परीक्षक यांचे जवळच्या नातेवाईकाचे निधन झाल्याने तेही परवानगी घेऊन अनुपस्थित आहेत. स.सदस्य श्री.बारवाल यांनी मांडलेल्या सूचनेवर संबंधीत अधिकाऱ्यांना माझेदालनात बोलावून त्यांचेकडून शहानिशा करून घेण्यात येईल. त्यावेळी आपणासही बोलावण्यात येईल व व्यवस्थीत निर्णय घेतला जईल.

श्री.गजनन बारवाल : एक महिन्यापासून पाठपुरावाकरतो आहे. माझे काका चकरा मारून कंटाळलेले आहेत. यासंचिकेवर असा शेरा आला की, ड्रेनेज विभागाकडून तपासणी करून घेणार आहेत की नाला या प्लॉटमधून गेलेला आहे का? परंतु नाला या प्लॉटमधून गेलेलाच नाही. चुकीने नाल्याचा प्रवाह होता आता पूर्णपणे भरती झालेली आहे. परवानगी देण्यासंबंधी गंभीर दखल घ्यावी.

मा. सभापती : एकाच वेळी संचिकेवर उणिवा काढाव्यात. एकदाच निर्णय घेण्यात यावे. त्यानंतर मंजूर किंवा नामंजूर असा अंतिम निर्णय घेण्यात यावा.

सौ.लता दलाल : ५-६ बैठकीपासून सर्व स.सदस्यांनी अनेक प्रश्न उपस्थित केलेले असून अनेक तक्रारी संबंधीत विभागाकडे केलेल्या असून नुसती चर्चा करतो. माहिती काहीच मिळत नाही. कार्यवाही होते किंवा नाही हे कळायला मार्ग नाही. आजजरी अधिकारी उपस्थित नसले तरी यासाठी आपण विशेष बैठक आयोजित करून जी माहिती देण्याबाबत सुरूवातीच्या बैठकीपासून मागणी करीत आहोत ती सर्व माहिती देण्यात यावी. कार्यवाही झाली नसेल तर का झाली नाही याचाही खुलासा घ्यावा.

श्री.दिलीप गायकवाड : औरंगपुरा येथील नाल्यावर जी शिवाई ट्रस्टला कमर्शियल परवानगी दिली त्याच प्रमाणे ७-८ वर्षापुर्वी पत्रकार भवन म्हणून सिध्दार्थ उद्यानाजवळ जगा देण्यात आलेली असून त्यांनाही नाल्यावर का परवानगी देण्यात आलेली नाही.

मा. सभापती : सर्व स.सदस्यांना सूचना करण्यात येते की, नगर रचना विभाग वगळून इतर विभागाशी संबंधीत चर्चा करावी. ९ तारखेला पुन्हा बैठक आयोजित करण्यात येईल त्यावेळी या विभागाशी संबंधीत चर्चा करावी.

श्री.रेणुकादास वैद्य : मा.आयुक्तांचे मार्गदर्शनाखाली आशावादी राहून बजेटला सभागृहाने मंजुरी दिली. उत्पन्न वाढेल अशा बाबी नमूद आहेत. परंतु मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुलीत वाढ होते आहे असे दिसून येत नाही. श्री.घोडके म्हणून जय विश्वभारती कॉलनीतील गृहस्थांनी त्यांचे दुकानास कर आकारावा म्हणून 'फ'वॉर्ड कार्यालयात अनेकदा गेले. अद्यापपर्यंत त्यांचे दुकानास टॅक्स लावण्यात आला नाही. जे कर भरणा करीत नाही त्यांचेकडे मनपाचे कर्मचारी जत नाही तो भाग वेगळा. परंतु जेटॅक्स भरण्यास तयार आहेत त्यांचेकडून भरून घेऊ शकत नाही. तेवढी सुविधा उपलध होत नाही. अशी परिस्थिती असून वॉर्ड 'फ' मध्ये स.सदस्य श्री.संजय जेशी यांनी कुलूप लावले. तसेच वॉर्ड 'ड' मधील श्री.पाटील नावाचे गृहस्थांनी सुध्दा त्यांचे ओपन प्लॉटला टॅक्स आकारावा म्हणून १५ दिवसापासून चकरा मारतात परंतु कार्यवाही होत नाही. जनता टॅक्स भरण्यास तयार असताना वसुलीचे उद्दीष्ट मोठे असताना मनपा या बाबतीत दक्ष का नाही? वॉर्ड ऑफिसमध्ये जे कर्मचारी टॅक्स वसुलीसाठी दिले ते तांत्रिकदृष्ट्या सक्षम नाहीत असे वाटते. कर वसुलीसाठी मनपाने सतर्क असावे.

मा. सभापती : स.सदस्य श्री.वैद्य यांनी केलेल्या सुचना योग्य आहेत. त्या ठिकाणी कर निरीक्षक नसल्यामुळे सुरळीत काम सुरू झालेले दिसून येत नाही. त्या भागातील नागरीक टॅक्स आकारणीसाठी येतात परंतु तेथे सुविधा उपलब्ध नाही. वॉर्ड कार्यालयास कर निरीक्षक देण्यात यावे. सर्व स.सदस्य हे मनपाचे ट्रस्टी आहेत. एक स.सदस्यांनी मनपाच्या कार्यालयास कुलूप लावून बंद ठेवायचे. अधिकारी ऐकत नसतील तर मा.महापौर, मा.आयुक्त आहेत. त्यांना या बाबतीत कल्पना देणे गरजेचे होते.

श्री.रेणुकादास वैद्य : ही वेळ त्या नगरसेवकावर का आली, भावना समजून घ्याव्या. नागरीक १५-१५ दिवस चकरा मारतात परंतु टॅक्स भरून घेतला जत नाही.

श्री.गजनन बारवाल : स.सदस्यांच्या भावना लक्षात घ्याव्या. यापुढे असे होणार नाही. जेझाले ते योग्य नाही. परंतु प्रशासनाने सुध्दा दखल घेतली पाहिजे नागरीक वॉर्ड कार्यालयात येतात त्यांचे प्रश्न सोडविणे हे प्रशासनाचे काम आहे. वेळीच कार्यवाही झाली पाहिजे

सौ. लता दलाल : वॉर्ड कार्यालये होऊन एक महिना झाला. वॉर्ड कार्यालयामार्फत किती वसुली झाली, किती ठिकाणी व्यवस्थित कचरा उचलला जत आहे? किती कर्मचारी कामावर आहेत, स्वच्छतेसाठी महिला अधिकारी दिल्या त्यांनी किती काम केले? मोठ्या स्वरूपात पाऊस पडत आहे. अनेक रस्त्यांवर खड्डे पडलेले असून अनेक नगरसेवकांनी मुरूम टाकण्याची मागणी करून काम होत नाही. तातडीने कामे होण्यासाठी वॉर्ड ऑफिसची निर्मिती केली. परंतु कामात सुसूत्रता कोठेही दिसून येत नाही. नगरसेवकाने कुलूप लावले ही चुक झाली असेल. परंतु ती वेळ का

येते याचा सुध्दा विचार व्हावा. आजएका ठिकाणी झाले उद्या इतर ठिकाणी होईल. कदाचित उद्या मोर्चे यायला सुरूवात होईल. याचे गांभीर्य लक्षात घेऊन कार्यवाही व्हावी.

श्री.रेणुकादास वैद्य : पाच महिन्याचा कालावधी उलटला. उद्दीष्ट ठरविल्यानुसार त्या प्रमाणात वसुली होत आहे का? वसुली संदर्भात कोणती पावले उचललेली आहेत दिसून येत नाही. जे नागरीक टॅक्स भरण्यास येतात तेथे कमृचारी उपस्थित नसतील तर यासारखे दुर्दैव नाही.

श्री.विनायक पांडे : कर आकारणीसाठी तांत्रिक कर्मचारी असावेत. क.लिपिकाकडे हे काम देऊ नये. तसेच वॉर्ड कार्यालय 'अ' चे वॉर्ड अभियंता सात-आठ दिवसांपासून निलंबीत आहेत त्यांचे जगी दुसऱ्या कुणाला कार्यभार सोपवावा. आमच्या समस्या मांडता येतील.

श्री.अजिजजहागिरदार : स्पेक कंपनीमार्फत मालमत्तांचा सर्व्हे करून घेत आहोत. अट क्र.२.६ काढून घेतलेली आहे. त्यात ३०० अभियंता, सर्वेक्षक, लिपिक हे लोक सर्व्हेसाठी आवश्यक आहे ती अट काढून घेतली. १०वी, १२वी शिक्षण घेत असलेल्या मुलांकडून सर्वेक्षणाचे काम चालू आहे. ही अट कोणाच्या आदेशानुसार रद्द केली. सर्वसाधारण सभा किंवा स्थायी समिती सभेने अट रद्द केली आहे. संबंधीत एजन्सीला वर्क ऑर्डर देऊन दीड वर्ष झाले. काम करण्याची मुदत ६ महिने दिली होती. कलम १२७ प्रमाणे २० फेब्रुवारीच्या बैठकीमध्ये जे मालमत्ता कर लावतील ते मंजूर करून घ्यावा असे आहे. त्यानंतर एप्रिल मध्ये नोटीस देण्यात याव्यात. २००४ मध्ये काम दिले, २००४ चा फेब्रुवारी महिना गेला पुन्हा २००५ चा फेब्रुवारी महिना गेला. नवीन मालमत्तांवर जे कर लावणार त्याप्रमाणे वसूली होणार होती. १ वर्षाचा मालमत्ता कर मिळालाच नाही. पुन्हा २००५ चे सहा महिने गेले. हे जे नुकसान होत आहे त्याची जबाबदारी कोणावर फिक्स करणार? प्रत्येक वर्षाला २ कोटी गृहीत धरल्यास २ वर्षाचे ४ कोटीचे नुकसान होत आहे. यास जबाबदार कोण?

श्री.दिलीप गायकवाड : २९ जुलै २००५ रोजी मनपाने एक जहीर प्रगटन दिले होते. त्या संदर्भात प्रशासकीय अधिकारी यांनी ८ दिवसात अहवाल सादर करावा म्हणून मागील बैठकीत आदेशीत केले होते. आपणाकडे अहवाल सादर झालेला आहे का?

श्री.अजिजजहागिरदार : निविदेतील अट क्र.१० मध्ये असे आहे की, मुदत संपल्यानंतर सदर एजन्सीकडून प्रत्येक दिवसाला रू.५०००/- दंड आकारणी करून वसूल केली जईल. तशी कार्यवाही होत आहे का?

श्री.गजनन बारवाल : याबाबत सविस्तर खुलासा घेण्यात यावा.

सौ.संगिता जधव : माझ्या वार्डातील सर्व्हे नं.५२ हा ले-आऊट ५/५/९८ ला मंजूर करण्यात आला. यातील रस्ते व खुली जगा सध्या अस्तित्वात आहे का?

श्री.मिलींद दाभाडे : ५०% सर्वेक्षण हे बोगस झालेले असून संबंधीत एजन्सीचे कोणीही कर्मचारी माझ्या वार्डात आलेले नाहीत. ज्या भागाचा सर्व्हे झाला असे दाखविले त्या भागातील १००-२०० लोकांना आपणासमोर आणू शकतो. त्या लोकांची यादी सुध्दा देऊ शकतो. आंबेडकरनगर भागात पुर्वीचा सर्व्हे व आता केलेला सर्व्हे यात १%ही फरक दिसून येणार नाही. बंद खोलीत मागच्या अभिलेखावरून काम केले आहे. संबंधीतास दिलेला ठेका रद्द करून कायदेशीर कार्यवाही करावी.

सौ. लता दलाल : स्पेक सिस्टीम ही एजन्सी एक आंतरराष्ट्रीय ख्यातीची एजन्सी आहे. उपगृहाद्वारे अफगाणीस्तानमध्ये लादेनच्या प्रकरणात या एजन्सीने सर्व्हे केलेला आहे. असे असतांना १२ लाख लोकसंख्येचे शहर असलेल्या वस्त्यांचे सर्वेक्षण एक-दीड वर्षात होत नाही. प्रत्येक वार्डातील माहिती घेतली तर अनेक ठिकाणी एजन्सीच्या कर्मचाऱ्यांनी पैशाची मागणी केलेली आहे. माझ्या वार्डातच १५-२० लोकांची तक्रार आहे. मनपा सर्व्हे करीत नाही. भ्रष्टाचार होतो म्हणून आरोप होतो म्हणून खाजगी संस्थेकडे सर्व्हे दिला. सहा महिन्याची मुदत होती ती वाढवून दिली. एक वर्षानंतरही सर्व्हे झाला नाही. मुदतीनंतर दंड आकारणी करण्याची अट होती. आज विकास कामासाठी पैसे नाही म्हणून कामे सुरू करण्यासाठी विचार करावा लागतो. हा सर्व्हे जेऊन जस्तीत जस्त उत्पन्न मिळावे याकरीता कार्यवाही केली होती. परंतु सदर एजन्सीने मनपाचे दोन वर्षात जवळपास ४-५ कोटीचे नुकसान केलेले आहे. म्हणून हे काम त्यांचेकडून काढून घ्यावे व दंड आकारण्यात यावा. पैठणगेट भागातील एका घराची माहिती घेतली परंतु ते पूर्णपणे रेकॉर्ड दाखवू शकले नाहीत. हे काम जर या एजन्सीला जमत नसेल तर किती दिवस नुकसान करून घेणार आहोत याचा खुलासा करावा.

श्री.रेणुकादास वैद्य : मालमत्तांचा सव्हह हा तज्ञ कर्मचाऱ्यामार्फत होणे आवश्यक होते. परंतु सदर कंपनीने १०वी-१२वी शिकत असलेल्या गरजूमुलांकडून कमी पगारावर हे काम करून घेत आहे. याची तपासणी करून तातडीने अंमलबजवणी करणे शक्य नाही. सर्वेक्षणाचे काम काढून घ्यावे व कोणत्याही प्रकारचे बील न देता दंडात्मक कार्यवाही करावी.

श्री.मिलींद दाभाडे : स्पेकचे सर्वेक्षण ज्या अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली झाले त्या अधिकाऱ्यावर ही दंडात्मक कार्यवाही व्हावी. त्यांचेकडून खुलासा घ्यावा.

मा. सभापती : स्पेक कंपनीचे सर्व्हेचे काम ज्यांच्या अधिपत्याखाली चालू होते ते काही अपरिहार्य कारणामुळे एक महिन्यापासून कार्यालयात नाहीत. तसेच दुसरे संबंधीत अधिकाऱ्यावर निलंबनाची कार्यवाही झाल्याने तेही उपस्थितनाहीत. या संदीर्त आगामी सभेत माहिती देण्यात यावी. संबंधीत एजन्सीला मनपाच्या वतीने कोणतेही बील अदा केलेले नाही. ही एजन्सी आंतरराष्ट्रीय ख्यातीची असल्याचे नावाखाली मनपाचे नुकसान करीत असेल तर त्याबाबत विचार करण्याची गरज आहे. सर्व्हेचे काम दिल्यापासून दोन्हीही सभागृहात यासंबंधी सतत चर्चा होते आहे. या बाबतीत मुळात जण्याची व अभ्यास करण्याची गरजआहे. आंतरराष्ट्रीय ख्यातीची असेल, डिफेन्समध्ये उपयोग झाला असेल त्याचा विचार करण्याची गरजआहे. सदर प्रकरणात निविदा काढणे, कार्यादेश देणे इ.पासून वेळोवेळी जी चर्चा झाली सर्वच बाबीची संयुक्त बैठक घेवून आठ दिवसात अहवाल द्यावा. ५० हजर पेक्षा जस्त मालमत्तांचा सर्व्हे होऊ नये यासाठी कोणी षड्यंत्र करीत असेल व मनपाची बदनामी करीत असेल तर ते बरोबर नाही. टॅक्स भरणाऱ्यांना टॅक्स वाढवायचा व न भरणाऱ्यांना खतपाणी घालण्याचे काम कोणी करीत असेल तर हे योग्य नाही. प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी. संपूर्ण चौकशी करून ८-१५ दिवसात अहवाल द्यावा. प्रशासनाच्या वतीने मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

मा. आयुक्त : वॉर्ड -फ येथीलकारण काय याची माहिती घेण्यात येईल. दुसरे असे की वॉर्ड कार्यालयास कुलूप लावण्या इतपत घटना घडत असतील तर त्या अगोदर

आयुक्त किंवा उप आयुक्तांना याबाबत कल्पना द्यावयास पाहिजे होती. जेणे करून तातडीने कार्यवाही करता आली असती. कर आकारणी करण्यासाठी तांत्रिक कर्मचारी असावे ते अधिकार देण्यासाठी मला अधिकार होते म्हणून स्थायी समितीकडे आलेले नाही. कराच्या बाबतीत सर्व अधिकार वॉर्ड अभियंता यांना दिलेले आहे. वॉर्ड इंजिनिअरचा सल्ला घेऊनच मालमत्ता कर आकारणी निश्चित करायची आहे. कर आकारणी निश्चित करतेवेळी वॉर्ड इंजिनिअरचा अभिप्राय असणारच आहे. प्रत्येक वॉर्ड कार्यालयात ३ कर निरीक्षक दिलेले आहे. प्रथम हेअरींगचे अधिकार दिलेले आहे. कर्मचारी निश्चित करतील तेवढी रक्कम भरण्यास समोरची व्यक्ती तयान नसतील, ती जी रक्कम भरण्यास तयार असेल व त्यापेक्षा जस्त कर होत असेल तर जेवढीरक्कम भरण्यास तयार आहे ती रक्कम भरणा केल्यानंतरच अंतिम करण्यासाठी माझ्याकडे येईल. प्रत्येक कर निरीक्षक यांचेकडे एक कनिष्ठ लिपिक व ५-६ जवान देण्यात आलेले आहे. फक्त वॉर्ड 'क' मध्ये २ कर निरीक्षक आहेत. वसुली न होण्याचे कारण वॉर्डवाईज रेकॉर्ड वेगवेगळे झाले व एक लक्ष, ५० हजर, २५ हजर वरील थकबाकीदार यांची यादी काढावी. कारण थकबाकी वसूल करणार आहे. स्पेकचे बील या वर्षीचे वेगळे जणार आहे. १-२ तारखेला पेपरला वाचायला मिळाले. मोठ्या थकबाकीदारांकडील थकबाकी वसूल झाल्यानंतर ५-१० हजर थकबाकीदारांची यादी करून त्यांचेकडे मागणी करण्यात येईल. स्पेकच्या कामाबद्दलची स्थिती अहवालात दिली जईल. परंतु आतापर्यंत या एजन्सीला पैसे दिलेले नाही. शहरात १.४३ लक्ष मालमत्ता शोधलेल्या आहेत. मनपाच्या रेकॉर्डवर ९६ हजर आहेत. जवळपास ५० हजर जस्त मालमत्ता शोधलेल्या आहेत. ५-६ फॉर्म मी स्वत: बघितले त्यावर मालकाची सही पण आहे. सर्वांना नोटीस देऊन किती ऑब्जेक्शन येतात, किती चुक, किती बरोबर,ज्यामध्ये ऑब्जेक्शन आले नाही त्यापुरते रिलीज करणार. काही तक्रारी बरोबर होत्या. स्पेक कंपनीची चुक होती त्यांचे बील कंपनीला मिळणार नाही. ज्यांचे तक्रारी आल्या नाही त्याचे १०% तपासणी करणार. ९५-९६ हजर मालमत्ता लिंक व्हावयास पाहिजे घर बदलले नाही, बांधकाम बदलले नाही, नवीन वापर केला नाही त्यात करयोग्य मुल्यामध्ये बदल करू शकत नाही. जुन्या मालमत्तेत ज्यांनी काही नवीन बांधकाम केले त्यात कराचे दर व नवीन बांधकामावर कर एकत्रित करून घ्यावे लागत आहेत. त्यासाठी वेळ लागतो आहे. हे काम संपल्यानंतर नोटीस देणार आहे. एकाच वेळी २५-३० हजर लोकांच्या तक्रारी प्लॅन करून घेत आहे. पुढील महिन्यात बील देण्यात येतील. वॉर्ड कार्यालयाकडून वसुलीचे प्रमाण कमी होते म्हणून वसुली संदर्भात दोन्ही उप आयुक्त व शहर अभियंता यांचेकडे जबाबदारी टाकण्यात येत आहे. पाणी पुरवठ्याची थकबाकी तर वसुल करायची आहे. ती होणे आवश्यकच आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : खाजगी व्यक्तीला वसुली करण्यासाठी दिल्यास वसुली चांगली होईल, गती वाढेल. कारण अधिकारी त्यांचे मर्यादेत राहून काम करतात. २-३% प्रमाणे वसुलीचे काम दिलयास योग्य होईल यात फारसा खर्च होणार नाही. कृपया याचा विचार करावा.

श्री.गजनन बारवाल : या देशात बघितले तर रिलायन्स सारख्या मोठमोठ्या कंपन्या प्रत्येक महिन्याला बील देतात व वसुलसुध्दा करतात. लाखो लोक त्यांचेकडे काम करतात. ते करू शकतात तर आपण का नाही? खाजगी व्यक्तीला वसुली संदर्भात काही उपाय योजना केल्या तर योग्यच होईल. स्पेक कंपनीच्या काही कर्मचाऱ्यांनी पैशाची मागणी केलेली आहे. अशी संस्था काम करीत असेल तर त्यांचा ठेका रद्द करावयास पाहिजे.

श्री.अजिजजहागिरदार : १० खोल्या असतील तर ५ रिपोर्ट देतो आम्हाला किती पैसे देता असे काम या संस्थेचे चालू आहे. एखाद्या वार्डातील दोन संचिका काढाव्या व ही मालमत्ता कुठे म्हणून विचारले तर त्यांचेकडे उत्तर नाही.

मा. आयुक्त : १०% कामाची आपण आपल्या कर्मचाऱ्यांकडून तपासणी करून घेऊ.

सौ.लता दलाल : ६ महिन्याची मुदत दिली होती. २ वर्ष होत आहे. तरीसुध्दा अपेक्षेप्रमाणे काम झालेले नाही. १०% कपात करू. तक्रार असेल तर त्यांचे बील देणार नाही असे म्हटले. परंतु किती दिवस वाट बघणार आहात. आणखी माझ्या माहितीप्रमाणे ४-५ महिने त्यांना द्यावे लागतील. जे काम त्यांना देण्यात आलेले आहे त्यास उशीर झालेला आहे. यानंतर त्यांना मुदत देऊ नये. वॉर्ड अभियंता यांना अधिकार दिले. परंतु तेथे पुरेसा कर्मचारी वर्ग आवश्यक आहे. एका वॉर्ड ऑफीसमध्ये १६ वॉर्ड असेल तर त्यासाठी प्रत्येक वार्डासाठी एक कर निरीक्षक किंवा एक क.लिपिक असेल. त्यांचेकडे संपूर्ण रेकॉर्ड असणे आवश्यक आहे. आता माहिती घेतली असता रजिष्टर नाही, हेड ऑफिसला आहे असे सांगणार. कामास सुरूवात केली आहे ती योग्य पध्दतीने केल्यास जे अपेक्षित यश आहे ते मिळेल. स्वच्छतेच्या बाबतीत स्वतंत्र अधिकारी नियुक्त केले. वॉर्डातगाड्या देण्यात आल्या होत्या. स्वच्छतेसाठी बॅग ठेवल्या, घंटागाडी ठेवल्या असे असूनही प्रत्येक वॉर्डातून स्वच्छतेच्या बाबतीत तक्रारी येत आहेत.

श्री. गजनन बारवाल : वॉर्ड अभियंता यांना जेअधिकार दिले ते वॉर्ड अधिकारी यांना नाही याचे कारण काय?

मा. सभापती : त्या संदर्भातील विषय आहे त्यावेळी चर्चा करावी.

श्री.दिलीप गायकवाड : मागील बैठकीत सालारजंग व बागशेरजंग बाबत ३ दिवसात अहवाल सादर करणार होते. अद्याप माहिती समोर आलेली नाही.

मा. सभापती : नगररचना विभागा संबंधी प्रश्न उपस्थित करू नये. संबंधीत अधिकारी उपस्थित नाहीत. किती मोठे अतिक्रमण इमारत झाली असेल तरी कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात येतील. पुढील बैठकीत चर्चा करावी.

श्री.दिलीप गायकवाड : मागील बैठकीत नगर रचना विभागाचे अधिकारी यांनी अनधिकृत बांधकाम झाल्याचे म्हटले होते. तीन दिवसात कार्यवाही होणार होती. प्रशासकीय अधिकारी यांचे काम होते. माहिती द्यावी.

श्री.मिलींद दाभाडे : बागशेरजंग या जगेवर अनधिकृत जगेविषयी प्रश्न उपस्थित केलेला आहे. प्रशासकीय अधिकारी यांनी काय कार्यवाही केली याची माहिती त्यांना अपेक्षित आहे.

मा. सभापती : हा विषय नगर रचना विभागाशी संबंधीत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : नगर रचना विभागाने ते बांधकाम अनधिकृत आहे असे म्हटले होते. त्यावर प्रशासकीय विभागाने काय कार्यवाही केली?

मा. सभापती : वॉर्ड कार्यालयासंबंधी स.सदस्या सौ.लता दलाल तसेच स.सदस्या सौ.संगिता जधव यांनी सर्व्हे नं.५२ च्या बाबत तसेच बागशेरजंग भागात अनधिकृत बांधकाम होत आहे. प्रशासकीय अधिकारी यांनी कार्यवाही केलेली नाही. या सर्व मुद्यांवर मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

श्री.मिलींद दाभाडे : नंदनवन कॉलनी भागातही अनधिकृत बांधकाम होत आहे त्याचाही खुलासा देण्यात यावा.

मा. आयुक्त : प्रत्येक वॉर्ड ऑफीसमध्ये वॉर्ड अधिकारी, वॉर्ड अभियंता यांची नेमणूक केलेली असून दोन्ही अधिकाऱ्यांचे काम वेगवेगळे आहे. वॉर्ड अभियंता यांचेकडे त्यांनी सर्व प्रकारची देखभाल दुरूस्ती करावी. कमी रूंदीचे रस्त्यांची कामे करावी. लहान पाईपलाईनचे काम सुध्दा त्यांचेमार्फत होईल. त्यासाठी खर्चाचे अधिकार त्यांना दिले तसा प्रस्ताव ठेवलेला आहे. वॉर्ड अधिकारी यांना वसुलीचे अधिकार दिलेले आहेत. मालमत्तेत नवीन नाव लावणे, नांव बदलणे, नवीन मालमत्ता कर लावणे असे अधिकार दिले आहेत. तसेच स्वच्छतेच्या बाबतीतही अधिकार दिले आहेत. यात कोणीही अधिकारी जेष्ठ-कनिष्ठ नाही. एकाच दर्जाचे आहेत. पाणीपट्टी वसुली व मालमत्ता नवीन कर लावण्या संदर्भात त्यांचे एकत्रितपणे काम पडेल. तसेच टेंडर ओपन करताना आपसात संबंध येतील. एखादे काम वॉर्ड अधिकारी यांनी करायचे झाल्यास वॉर्ड अभियंता यांचे मार्फत करून घेणार. वॉर्ड अधिकारी यांचे अंतर्गत स्वच्छतेच्या कामासाठी ३ स्वच्छता निरीक्षक दिलेले आहेत. मनपाकडे एक सेंट्रल कक्ष आहे. घनकचरा व्यवस्थापन आहे. आताच त्यात बदल केलेला असून जेष्ठ डॉक्टर उनवणे यांना घनकचरा व्यवस्थापन प्रमुख म्हणून दिलेले आहे. ते पी.जी. व एम.डी.आहेत. लोकसंख्येनुसार कर्मचारी देण्यात आलेले होते. त्यात बदल करून जेनवीन कर्मचारी अनुकंपा तत्वावर घेतले ते सर्व वॉर्ड कार्यालयात दिले नाही. दोनच वॉर्ड कार्यालयात नियुक्त केले. ज्या भागात जस्त शॉपींग वगैरे आहे अशा भागात दिले. मजूर म्हणून जेकर्मचारी आहेत ते वॉर्ड ऑफिसमध्ये देणार आहोतच. २५ तारखेपासून मोहीम राबवित आहे. त्यात दोन उद्देश होते काही भागात अनेक दिवसापासून कचरा साचतो आहे. तो उचलला पाहिजे दुसरे असे की, बॅगमध्ये कचरा घेऊन विल्हेवाट लावणे. स्वच्छतेच्या बाबत प्रशासन जगरूक आहे. प्रत्येक वार्डातील जनतेला विनंती की, काही ठिकाणी दोन वेळेस कचरा उचलण्यासाठी जवे लागते. त्याची यादी आपणाकडे देऊ. एक ठराविक वेळात ते कचरा पडला तर उचलला जईल. याबाबत कुणाचे योग्य सजेशन असतील ते देण्यात यावे. वॉर्ड अभियंता यांना रू.१० हजर खर्च करण्याचे अधिकार दिले. यात तातडीचे काम असेल तर ते करता येईल. तसेच कचरा उचलण्यासाठी दोन नवीन ट्रक घेतलेल्या आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : जे सिस्टीम लावलेली आहे ती फक्त कागदोपत्री नसावी. त्याची अंमलबजवणी झाली पाहिजे. घंटागाडी मार्फत कचरा जमा होतो. घंटागाडीची वेळ जेव्हा संपते त्या वेळेस कचरा भरणारा ट्रक त्या ठिकाणी गेल्यास कचरा कुंडीत कचरा साठणार नाही. परंतु तसे होत नाही. घंटागाडीने कचरा जमा होतो. कचरा कुंडीत टाकला जतो. त्यानंतर कचरा वेचणारे लोक येतात सर्व कचरा पसरवितात त्यामुळे कचरा कुंडीतील कचरा उचलला जतो परंतु आजुबाजूला तसाच पडून असतो. तसेच

मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे रस्त्याच्या कडेला, ओपन स्पेसमध्ये गवत झालेले आहे. त्यासंबंधी कार्यवाही करावी.

मा. आयुक्त : फुटपाथवर किंवा डिव्हायडरवर फारच गवत दिसून येते. ४-५ रस्त्याचे गवत काढलेले आहे. ४०-५० मजूर यासाठीच घेतलेले आहे. प्रतयेक वर्षी आपण रस्त्याची स्वच्छता करतो. ड्रेसींग करतो. प्रत्येक मनपात रोड मजूर आहे. या महापालिकेत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : मंत्रीमंडळ बैठक समोर ठेवून करतो. चार रस्ते कले, अभिनंदन. सर्वच रस्ते करावे.

श्री.गजनन बारवाल : रस्ते स्वच्छ करण्याची मोहीम वाढवावी. चांगली बाब आहे. इतरही भागात ही मोहीम सुरू करावी. आणखी कर्मचारी वाढवावे. वॉर्ड अधिकारी व वॉर्ड अभियंता यांचेतील दरी कमी करावी. वॉर्ड अधिकारी व वॉर्ड अभियंता यांना सारखेच अधिकार असावे. वॉर्ड अधिकाऱ्यांना फक्त स्वच्छता, वसुलीचे काम दिले हे बरोबर वाटत नाही. हेअरींग घेणे, वगैरे हे सर्व एकत्रित बसून करावे लागेल. अॅक्टनुसार वॉर्ड अधिकारी हे वरीष्ठ असतात. वॉर्ड इंजिनिअर यांना कमी म्हणावयाचे नाही.

मा. आयुक्त : या वर्षीचे बजेट तयार झाले परंतु यानंतरचे बजेट हे वॉर्ड अधिकारीच तयार करणार आहे. सर्वात मोठे काम त्यांना राहील. फक्त एकत्रित बजेअ सादर करणार. बजेट तयार करण्याचे अधिकार वॉर्ड समिती यांनाच आहे.

मा. सभापती : प्रशासकीय अधिकारी यांनी सुजत गृहनिर्माण संस्था, पडेगांव, बागशेरजंग, सालारजंग येथील अनधिकृत बांधकामा बाबत, हर्सूल जटवाडा रोडवरील अनधिकृत प्लॉट विक्री बाबत तसेच गारखेडा सर्व्हे नं.५२ येथील मंजूर ले-आऊट प्लॉट विक्री बाबत सविस्तर खुलासा करावा.

प्रशासकीय अधिकारी : सुजता हौसिंग सोसायटीच्या अनधिकृत बांधकामा बाबत नगर रचना विभागाचा अभिप्राय घेऊन रस्त्यावरील अतिक्रमणाबाबत आजच कार्यवाही करण्यात येणार आहे. नंदनवन कॉलनी खुल्या जगेवरील अतिक्रमणाबाबत विधी सल्लागार यांचा अभिप्राय घेण्यात आला. या प्रकरणात मनपा आणि संबंधीत यांना प्रतिबंध करण्यात आलेले आहे. सुरू असलेले बांधकाम थांबविण्यात आलेले आहे. आता नवीन बांधकाम सु झालेले नाही.

श्री.मिलींद दाभाडे : झालेले बांधकाम तोडण्यात आलेले नाही. चुकीची माहिती देत आहेत. मा.आयुक्तांनी बांधकाम काढण्याचे आदेश दिले होते. कार्यवाही केली नाही. आजही तेथे २०-२५ गाड्या डब्बर पडलेले आहे. रात्री बांधकाम करतात.

प्रशासकीय अधिकारी : न्यायालयाचे स्थगिती आदेश असतांना बांधकाम सुरू होते. त्याचा पंचनामा करून, फोटो काढून कन्टेम्ट दाखल करण्याची कार्यवाही होईल. तसेच हर्सूल जटवाडा रोडवर अनधिकृत प्लॉटींग झालेली असून चार लोकांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

श्री.दिलीप गायकवाड : या शहरात ५० हजर प्लॉट विक्री केलेले असून आतापर्यंत चारच लोकांवर कार्यवाही होते. मिटमिटा ाागात आतापर्यंत किती लोकांवर कार्यवाही केली ?

प्रशासकीय अधिकारी : इतर भागातही कार्यवाही करण्या संदर्भात इमारत निरीक्षकांना सुचना दिलेल्या आहेत. त्या जगेची कागदपत्रे जमा करून इतर प्रकरणातही गुन्हे दाखल करण्याची

कार्यवाही करण्यात येईल. मिटमिटा भागातही प्लॉटींग केलेली होती तेथील बोर्ड व खुणाचे दगड नामशेष करण्यात आलेले आहेत.

श्री.दिलीप गायकवाड : मिटमिटा भागात आजही अनधिकृतपणे प्लॉट विक्री होत आहे. त्यांचेवर काय कार्यवाही होणार आहे?

प्रशासकीय अधिकारी : असे जेथेबांधकाम चालू असेल त्या जगेचे मालकी हक्काचे कागदपत्र, रजिष्ट्री व सातबारा कलेक्ट करून संबंधीताविरूध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात येईल. ८ दिवसात कार्यवाही होईल. बागशेरजंग, सालारजंग यामध्ये साधारणपणे इंदिरानगर बायजेपुरा, किराडपुरा, शरीफ कॉलनी, रशिदपुरा, मजनूहिल या ठिकाणी संपूर्णपणे वसाहती झालेल्या आहेत. थोड्याफार प्रमाणात अनधिकृत बांधकाम होते त्याविरूध्द नोटीस देऊन कार्यवाही प्रस्तावित करण्यात येते.

सौ.लता दलाल : संबधित अधिकारी हे समाधानासाठी उत्तर देत आहे असे वाटते. अमुक व्यक्तींना नोटीस दिली त्यांना सागंण्यात आले ,काही प्रकरणे कोर्टाकडे आहे. महानगरपालिकेचे बीपीएमसी ॲक्ट मधे काय आहे त्यानुसार जे २४ तासाची ,तीन दिवसाची किंवा ७ दिवसाची नोटीस देवून अशी किती बांधकामे पाडण्यात आलेली आहे याचा खुलासा करावा.अधिकारी सांगतात काही ठिकाणी संपूर्ण वस्ती आहे. परंतू ज्या ज्या ठिकाणी नाला आहे त्या ठिकाणी एका बांधकामाच्या संदर्भात संबधीत अधिकाऱ्यांना माहिती दिलेली होती.अधिकारी यांनी असे उत्तर दिले की त्या व्यक्तीकडे पीआर कार्ड आहे.संबधितांनी महानगरपालिकेची परवानगी घेतलेली आहे का असा माझा प्रश्न होता ते तपासण्यात येईल असे उत्तर अधिकारी देतात.माहिती दिली तरी कार्यवाही होत नसेल तर योग्य नाही.आताच सांगण्यात आले की चार प्लॉट विक्री धारकावर कार्यवाही केली ,नंदनवन कॉलनी येथील बांधकामाच्या संदर्भात पंचनामा करणार अशी कार्यवाही करणे बरोबर नाही. होत असलेले बांधकाम कशा पध्दतीचे होते त्या जगेच्या संदर्भात पी.आर.कार्ड होते किंवा नाही.ती जगा कुणाची होती किती दिवसाची नोटीस देणे आवशक होते.त्यानुसार नोटीस दिलेली आहे का नोटीस दिल्यानंतर मुदत संपली त्यानंतरही बांधकाम चालू ठेवले ते पाडण्यात आलेले आहे अशा किती प्रकरणाच्या बाबतीत कार्यवाही केलेली आहे .याची माहिती देण्यात यावी. सभागृहाची दिशाभूल करू नये अशी विनंती आहे.

प्रशासकीय अधिकारी :बालाजीनगर येथे तीन बांधकामे चालू होती एक प्राथमिक अवस्थेत पाडण्यात आले. एका बांधकाम धारकांनी गुंठेवारीमधे संचिका दाखल केलेली आहे. बालाजीनगर ही सालारजंग मधील वसाहत पूर्ण पणे विकसीत झालेली आहे.तसेच शिवशंकर कॉलनी येथे तीन बांधकामे चालू होते ती प्राथमिक अवस्थेत तोडून त्यांना नोटीस तामील केलेली आहे.या संदर्भात त्यांचे विरूध्द कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.न्यूशांतीनिकेतन कॉलनी ही वसाहत विकसीत झालेली असून तेथील एकदोन प्लॉट खाली आहे त्यावर अनधिकृतपणे बांधकाम होत आहे विशालनगर भागात काल्डा कॉर्नर या ठिकाणी बांधकामे सुरू आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : प्रशासकीय अधिकारी सांगतात ही वसाहती विकसीत झाली ती विकसीत होते कसे जेव्हा अनाधिकृत बांधकामे होत गेली तेंव्हा या विभागामार्फत का कार्यवाही झालेली नाही.बांधकाम होईपर्यत संबधितांनी अधिकाऱ्यांना हाताशी धरायचे व

बांधकाम झाल्यानंतर ते पाडायचे नाही असे काही आहे का ?याचा खुलासा करावा.

सौ.लता दलाल : नगर रचना विभागाने बांधकामास परवानगी दिल्यानंतर संबधीत विभागाकडून ती संचिका प्रशासकीय विभागाकडे पाठविल्या जते असे अधिकारी सांगातात त्यानंतर संदर जगेवर जस्तीचे बांधकाम होते किंवा काय हे पाहण्याचे काम प्रशासकीय विभागाचे आहे . प्रशासकीय विभागास माहिती विचारली असता सदर बांधकामाची संचिका आमच्या विभागात आलेली नाही असे उत्तर ऐकावयास मिळते .अधिकारी एकमेकांचे नाव दाखवितात.त्यामळे समोरच्या व्यक्तीला अनधिकृत्त बांधकाम करण्याची संधी मिळते अशा बांधकामाबाबत किती लोकांवर कार्यवाही केली आहे त्याची माहिती देण्यात यावी.

प्रशासकीय अधिकारी :सध्या या बाबतीत माझ्याकडे माहिती नाही. माहिती घेवून देण्यात येईल.

सौ.लता दलाल :असे उत्तर मा.आयुक्त ,मा.सभापती समोर देणे योग्य नाही. संबधित अधिकारी यांना कार्यभार स्विकारून एक वर्ष झालेले आहे अशा प्रकरणाची एक तरी संचिका आलेली असेल ,किंवा संचिकाच आलेली नाही असे उत्तर दयावे माहिती नाही असे उत्तर देणे कितपत योग्य आहे.

श्री.शंशाक विसपूते : अनधिकृत बांधकाम होते हे सर्वसामान्य लोकांच्या लक्षात येते अधिकाऱ्याच्या का येत नाही.आम्हा सदस्यांकडून माहिती दिली तर त्या संबधीची माहिती संबधीतास दिली जते कि अमुक नगरसेवकांनी या बांधकामाच्या संदर्भात पत्र दिले या बाबतीत आम्हाला दुरध्वनीवरून संबधीत लोक बोलात ते काम अमुक व्यक्तीचे आहे पत्र कशासाठी दिले ही माहिती त्या व्यक्तींना कोण देते.ज्यात महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होते .यामधे प्रशासकीय विभागाचा हेतू काय असतो.

श्री.विनययक पांडे : इमारत निरीक्षक हनुमान टेकडीवर जतात परंतु ज्यसिंगपूरा चौकातील जे मस्ज्दि व खामनदीच्या पुलाच्या कठडयातून १५ फुटाचा महानगरपालिकेचा रस्ता होता. दोन वर्षापासून गेट टाकून रस्ता बंद केलेला आहे आजपर्यत कार्यवाही केलेली नाही.पुरातत्व विभागाचे अधीक्षक श्री.मित्रा यांनी मकबरा समोरील अतिक्रमणाच्या बाबतीत अनेकवेळा तत्कालीन आयुक्त यांना पत्र दिलेले होते त्या बाबतीत काय कार्यवाही केलेली आहे याबाबतीत खुलासा करावा.

मा.सभापती :स.सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्या अत्यंत बरोबर आहे. या शहराचा वाढता विकास वाढती लोकसंखया त्यानुसार होणारा पाणी पूरवठा रस्ते व ड्रेनेज यावर जे अतिरिक्त जस्तीचा खर्च होत आहे त्याचे कारण असे की शहरात कोणतेही प्लॅनींग न करता अनधिकृत वस्त्या वाढत आहे.व त्यावर जे खर्च होतो त्याचा भार हा जे टॅक्स भरणा करतो त्यांचेवर येतो.यास महानगरपालिकाच जबाबदार आहे.सर्वांच्या भावना लक्षात घेता प्रशासनास अशा सूचना देण्यात येत आहे की,जेही अतिक्रमण होत आहे त्यास जबाबदार प्रशासकीय अधिकारी यांना धरण्यात येईल.चांगले शहर करण्याच्या दृष्टीने लोकप्रतिनिधी यांचीही जबाबदारी आहे अधिकाऱ्याची ही आहे.हे शहर विकसित होण्याच्या दृष्टीने प्रशासकीय विभागाने अत्यंत जगृततेने काम करावे.कोणत्याही भागातील बांधकाम असेल त्या व्यक्तीकडे संपूर्ण कागदपत्र असणे आवशक आहे नसता ते अनधिकृत बांधकाम समजून काढण्यात आले पाहिजेआवशकता भासल्यास पोलीस फोर्सची

व्यवस्था होईल आपण मागणी करावी.संरक्षण दिले जईल.आठ दिवसात ज्या ज्या भागात अनधिकृतपणे बांधकाम झालेले आहे व त्या संबधाने आपण केलेली कार्यवाहीची प्रकरणे किती व कोणत्या भागात किती अनधिकृत बांधकामे झालेली आहे याचा वस्तीनिहाय या सभागृहास माहिती देण्यात यावी अशा सूचना देण्यात येत आहे इतर कोणतेही कारण त्यावेळी देवू नये.

श्री.गायकवाड दिलीप :ज्या ठिकाणी क्रिडांगणासाठी जगा महानगरपालिकेने राखीव ठेवलेली होती त्या ठिकाणी मोठमोठया इमारती झाल्या कशा याचा अहवाल तीन दिवसात सादर करणेच्या सूचना दिलेल्या होत्या अहवाल सादर केलेला आहे का.

मा.सभापती :प्रशासकीय अधिकारी यांनी त्यांना आताच सूचना केल्याप्रमाणे कार्यवाही करावी कोणीही अडथळा आणणार नाही.

श्री.रेणूकादास वैद्य :शहरात राजस्थानी लोक गूरे घेवून जतात रस्त्यावरील गार्डनची ओपनस्पेस व रस्त्यावरील वाहतूकीची पूर्णपणे वाताहात या लोकांनी केलेली आहे हे जनावरे पूर्णपणे रस्त्याने मोकाट फिरतात. यावर कोणाचेही नियंत्रण नाही कार्यवाही करता येत असेल तर ती करावी.

मा.सभापती :या संदर्भात पशु वैद्यकीय अधिकारी यांनी कार्यवाही करावी शहरात कोणतेही मोकाट जनावरे असू नये अशी तरतूद आहे.त्यानूसार या संबधी उदयापासून कार्यवाही करावी.जे व्यत्यय येत आहे तो थांबवावा.

श्री.शंशाक विसपूते :यपूर्वी शहरात दारीद्रय रेषेखालील लोकांचा सर्वे होणार आहे परीपत्रक आलेले होते पून्हा पत्र आले परंतू आजपर्यत कोठेही वार्डात सर्वे झालेला दिसून येत नाही.संबधीत अधिकाऱ्याशी मी वारंवार या बाबत चौकशी केली आहे काही भागातील सर्वे होणे आवशक आहे शुन्य झालेला नाही. यापासून लोक वंचित राहू नये.

मा.सभापती : संबधित विभागाचे अधिकारी हे वैद्यकीय रजिस्टर आहे. उपआयुक्त प्रशासन यांचेकडे जबाबदारी आहे. जेकर्मचारी नियुक्त केलेले असतील व ज्या एजन्सीला हे काम दिलेले आहे त्या बाबतीत दर आठ दिवसाला माहिती घेण्यात यावी.व कोणत्या भागात कोणते कर्मचारी नियुक्त केलेले आहे याची माहिती नगरसेवकांना देण्यात यावी जेणे करून ज्यांचे नाव नगरसेवकाकडे आलेले असेल ते नाव संबधीत कर्मचाऱ्याकडे स.नगरसेवक देतील.यामूळे सर्वे करण्याच्या दृषटीने प्रशासनास मदत होईल.या बाबतीत अमलबजवणी तात्काळ होण्याच्या दृष्टीने वार्ड अधिकारी यांना सूचना कराव्यात.

सौ.लता दलाल :महानगरपालिकेतील काही क.अभियंते व दुय्यम अवेक्षक यांनी व्यावसायिक परीक्षामधे अनुत्तिर्ण झाल्यामूळे नाशिक येथील संस्थेकडे गुण पडताळणी करीता अर्ज दिल्यामूळे या संस्थेकडून सदरचे कर्मचारी हे उत्तीर्ण झाल्याचे मा.आयुक्त महानगरपालिका यांना टपालाने कळविलेले होते.पूढे ते बोगस असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर १० वर्षानंतर या कर्मचाऱ्याविरूध्द कार्यवाही केली गेली. आजही काही कर्मचारी अशा प्रकारचे महानगरपालिकेत आहेत.याची सुध्दा प्रशासनाने चौकशी करावी.ज्यांचेवर निलंबनाची कार्यवाही केली त्यांनी महानगरपालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान केलेले आहे का नसेल तर प्रशासनाने या बाबत काय निर्णय घेतलेला आहे. माझ्या माहिती प्रमाणे न्यायालयाकडून या कर्मचाऱ्याची सूटका झालेली आहे.कारण आजस्थितीत क.अभियंता यांची संख्या कमी आहे.

दुय्यम अवेक्षकची आवशकता आहे. आर्थिक नुकसान न करता हे कर्मचारी निलंबीत आहे.ज्यांनी आर्थिक नुकसान केले त्यांचेबाबत कार्यवाही होत नाही. आमची मागणी आहे या कर्मचाऱ्यांना कामावर घ्यावे त्यांनी कोणतेही महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केलेले नाही.खोटी माहिती दिली वगैरे याची चौकशी होत राहील परंतु त्यांना तात्काळ निलंबीत करणे कितपत योग्य होते या बाबत प्रशासनाने खुलासा करावा.ठिक आहे त्यांची काही चुक झाली असेल त्यांचे एक वेतनवाढ बंद करावी परंतु त्यांना कामावर घ्यावे अशी आमची मागणी आहे

श्री.बारवाल गजनन :त्यांचेवर कार्यवाही केली कोर्ट प्रकरण झाले.हे सर्व ठिक आहे परंतु आज महानगरपालिकेत अभियंत्यांची गरज आहे .योग्य तो निर्णय घेण्यात यावा या बाबत प्रशासनाची नेमकी भुमिका काय याचा ही खुलासा करावा.

मा.सभापती :या संदर्भात माझ्या माहिती प्रमाणे खातेनिहाय चौकशी करण्यात आलेली आहे तो अहवाल प्रशासनाकडे आहे या कर्मचाऱ्यावर कशाच्या अधारे कार्यवाही केलेली होती या संदर्भात सभागृहाला माहिती देण्यात यावी अहवाल जे आहे तो वाचून दाखववावा.

उपआयुक्त(प्रशासन) : क.अभियंते व दुय्यम अवेक्षक महानगरपालिकेच्या सेवेत कार्यरत होते नाशिक येथील मेरी संस्थेचा अहवाल प्राप्त झाल्यामूळे त्यांचेवर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

श्री.रेणूकादास वैद्य :मागिल बैठकीत एका कर्मचाऱ्याचे निलंबन झाले असतांनाही त्यांनी पगार उचलला या संदर्भात चर्चा झालेली होती त्याचा अहवाल सादर करणार होते माहिती देण्यात यावी.

सौ.लता दलाल : चार कर्मचाऱ्यांना नोटीसा देवून कार्यवाही करणार होते त्याची माहिती देण्यात यावी.

उपआयुक्त(प्रशासन) : श्री.खरे नावाचे कर्मचारी यांचे बाबतीत अहवाल माझ्याकडे आहे. प्रशासनावर दबाव आणणे,कार्यालयीन कामात शिस्तभंग करणे,वरीष्ठाचे आदेश न पाळणे ,या आरोपाखाली त्या संदर्भात स्थायी समितीमधे चर्चा झालेली होती त्यानंतर प्रशासनाने चौकशी करून त्यांची प्रशासनाने एक वेतनवाढ एक वर्षासाठी थांबविलेली आहे त्याच प्रमाणे मागील एका प्रकरणामध्ये श्री.खरे आणि इतर चार व्यक्ती त्यांनी उपआयुक्त तसेच मा.महापौर दालना समोर गोंधळ घातला होता त्या बाबतचा तीन दिवसात खुलासा मागविलेला आहे खुलासा त्या कर्मचाऱ्याचा प्राप्त झालेला असून त्याची छाननी झालेली आहे आजत्या बाबतीत निर्णय होईल.

श्री.दिलीप गायकवाड :ही कार्यवाही कुणाच्या सांगण्यावरून केलेली आहे का , माझ्या माहिती प्रमाणे या कर्मचाऱ्या व्यतिरिक्त आणखी कर्मचारी होते.त्यांचेवर का कार्यवाही करण्यात आलेली नाही.

उपआयुक्त(प्रशासन) : मा.महापौर दालना समोर जेसुरक्षा रक्षक तैनात होते त्यांनी अहवाल दिलेला आहे व या कर्मचाऱ्याचे वृत्तपत्रात देखिल छायाचित्र आहे व व्हिडीओ शुटींग घेतली त्यात पण हे आहे कुणाच्या सांगण्यावरून कार्यवाही केलेली नाही.

श्री.दिलीप गायकवाड :व्हिडीओ कॅसेट आम्हाला दाखविण्यात यावी.आणखी बरेचशे कर्मचारी होते त्यांचेवर काय कार्यवाही केलेली आहे.

श्री.बारवाल गजनन :या संदर्भात वृत्तपत्रात बातमी आलेली आहे कार्यवाही तात्काळ त्या कर्मचाऱ्यावर झाली पाहिजेअशी आमची मागणी आहे.

श्री.मिलींद दाभाडे :ज्यांनी गोधंळ घातला ते रिपब्लीकन विरूध्द गटाच्या लोकांनी घातलेला आहे त्यात कर्मचारी असल्याचे वृत्तपत्रात नाही .व्हिडीओ शुटींगमधे आले असेल तर ते दाखविण्याची मागणी आहे. मागणीची पुर्तता करावी.

सौ.लता दलाल :राजकीय लोक असतील तो भाग वेगळा परंतू त्यांचेबरोबर कर्मचारी होते ही अत्यंत गंभीर बाब आहे महापालिकेत प्रशासन आहे, प्रशासनात शिस्त असते.प्रशासकीय बाब म्हणून कार्यवाही होणे आवशक आहे.छायाचित्र किंवा व्हिडीओ शुटींगमधे असेल तर तात्काळ कार्यवाही होणे आवशक आहे.कोणत्याही राजकीय पक्षांनी कर्मचाऱ्याना पाठींशी घालू नये.प्रशासन कार्यवाही करीत आहे ती करू दयावी.

श्री.दिलीप गायकवाड :माझ्या माहिती प्रमाणे आणखी कर्मचारी होते त्यांचेवरही कार्यवाही करावी.जणूनबूजून ४ कर्मचाऱ्यावरच कार्यवाही होवू नये.

मा.सभापती :चांगले प्रशासन चालविण्याच्या दृष्टीने या मागे कुणाचेही दुमत असण्याचे कारण नाही.कार्यवाही होत असतांना कुणावर अन्याय होत असेल तर तीही तेव्हढीच गंभीर बाब आहे.स.सदसयांच्या भावना लक्षात घेवून स.सदस्यांना कॅसेट दाखविण्यात येईल त्यानुसार कर्मचाऱ्यावर कार्यवाही करण्यात यावी.सभा संपल्यानंतर कॅसेट सभापतीच्या दालनात दाखविण्यात येईल. क.अभियंता व दुय्यम अवेक्षक यांचे संदर्भात सविस्तर चर्चा झालेली आहे मा.आयुक्तांकडे ती संचिका गेलीच असेल,त्या कर्मचाऱ्यावर पोलीस गुन्हे दाखल केले ते कशाच्या अधारे केले ते करणे आवशक होते का, ही जबाबदारीची कल्पना अधिकाऱ्यांना होती किंवा नाही याची कल्पना नाही या संदर्भात समिती स्थापन केलेली होती अहवाल नसेल तर चुकीची बाब आहे हे प्रकरण गोलमोल पध्दतीने हाताळलेले दिसते जर कर्मचाऱ्यावर अन्याय होत असेल व मनस्ताप त्यांना होत असेल तर दुर्दैवी बाब आहे या समितीची माहिती व जे अहवाल आहे तो वाचून दाखवावा.

सहाय्यक आयुक्त-१ :कार्यालयीन आदेश क्र. मनपा/अस्था-१/२००३/२३७६/दि.१४.११.२००३ अन्वये श्री. डि.जि निकम, क.अ., श्री. ए.यु.जधव, क.अ., श्री. भागवत फड, क.अ., श्री. एखलाख सिद्दीकी क.अ., विनायक बोडस दु.आ.,मंगलसिंग राजुत दु.आ. के.जी.दौड दु.आ., अविनाश जयवळ दु.आ., सुभाष जेशी दु.आ. , यांच्या खातेचौकशीसाठी माझी चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली असून प्रकरणात केलेल्या चौकशीचा अहवाल खालील प्रमाणे:

**संबंधीतांचे म्हणणे :**

चौकशी दरम्यान सर्वश्री. ए.यु.जधव, बी.डी.फड, डि.जे.निकम यांनी त्यांच्यावर कार्यालयातर्फे ठेवण्यात आलेले जेडपत्र २ मधील दोषारोपाबद्दल खुलासा सादर केला आहे की, डिसेंबर १९९५ साली त्यांनी कनिष्ठ अभियंता व्यावसायिक परिक्षा दिली होती. अभियांत्रीकी अधिकारी

महाविद्यालय नाशिक यांच्यातर्फे आम्हास निकाल दिलेला नाही किंवा कार्यालयाने सुध्दा आम्हास निकाल कळविलेला नाही त्यामुळे आम्ही अनुत्तिर्ण झाल्याचे समजून फेरतपासणीसाठी परिक्षा घेणाऱ्या संस्थेकडे अर्ज सादर केला. त्यानंतर परिक्षा घेणाऱ्या संस्थेने महानगरपालिकेस संस्थेच्या प्रचलीत पध्दतीनुसार निकाल पाठविलेला होता. आम्हास व्यक्तिश: निकाल परिक्षा घेणाऱ्या संस्थेने कळविलेला नाही. त्यामुळे आम्ही बनावट गुणपत्रिका दाखल केलेली आहे असे कार्यालयाचे म्हणणे चुकीचे आहे. तसेच निकालाच्या वैधतेबाबत आम्ही पुर्णपणेअनभिज्ञ आहोत. आम्ही व्यक्तिश: गुणपत्रिका दाखल केलेली नसल्यामुळे कार्यालयाची कुठल्याही प्रकारे दिशाभूल वा फसवणूक केलेली नाही असे आम्ही नम्रपणे नमुद करीत आहोत. आम्ही दिलेले पेपर चांगले गेलेले असल्यामुळे आमच्या उत्तर पत्रिकांची फेरतपासणीसाठी आम्ही अर्ज केलेला होता. परंतु फेरतपासणीचा निकाल आम्हास प्राप्त न झाल्यामुळे परिक्षा घेणाऱ्या संस्थेमार्फत पुढे घेण्यात आलेल्या परिक्षेत महापालिकेच्या परवानगी घेऊन आम्ही पुन्हा परिक्षा दिली दरम्यानच्या काळात परिक्षा घेणाऱ्या संस्थेमार्फत आयुक्तांच्या नावाने निकाल पत्र प्राप्त झाल्याचे समजले व त्या बाबतची नोंद आमच्या सेवा पुस्तिकात पूढील कार्यवाहीस्तव घेण्यात आली. सदरील निकालपत्र हे एकत्रीत असून टपालाद्वारेच प्राप्त झाले आहे. आम्ही व्यक्तिश: निकालपत्र दाखल केलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे आमच्यावर लावण्यात आलेले आरोप रद्द करण्यात यावे ही विनंती.

श्री. श्री. एखलास सिद्दीकी क.अ., विनायक बोडस दु.आ.,मंगलसिंग राजपुत दु.आ. के.जी.दौड दु.आ., अविनाश जाधवळ दु.आ., सुभाष जेशी दु.आ. , यांनी लेखी खुलासा केला आहे की, त्यांनी अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय नाशिक यांच्या तर्फे घेण्यात येणाऱ्या कनिष्ठ अभियंता व्यावसायिक परिक्षा १९९६ साली दिली. परिक्षेत आम्ही नापास झाल्याचे आम्हास समजल्यामुळे आम्ही पुन्हा १९९७ साली बीड केंद्रावरून परिक्षा दिली. १९९६ साली दिलेल्या परिक्षेचा निकाल आम्हास अस्थापना विभाग, महानगरपालिकामार्फत तोंडी कळविण्यात आला होता. परंतु आम्हास परिक्षेत पास होण्याची खात्री असल्यामुळे आम्ही परिक्षा घेणाऱ्या संस्थेकडे विनंती अर्जपाठवुन दिला होता. पुर्नमुल्यांकनाचा निकाल एक ते दिड वर्ष प्राप्त न झाल्यामुळे आम्ही पुन्हा कार्यालयाची रितसर परवानगी घेऊन १९९८ ची परिक्षा दिली. त्यानंतर जनेवारी १९९९ मध्ये नाशिक येथील अभियांत्रीकी अधिकारी महाविद्यालयातर्फे औरंगाबाद

महानगरपालिकेस डिसेंबर १९९६ मध्ये आम्ही दिलेल्या परिक्षेच्या फेरतपासणीचा निकाल प्राप्त झाल्याचे अस्थापना विभागातून आम्हास कळाले. आम्ही सन १९९६ चा निकाल कार्यालयास सादर केला असता तर आम्ही कार्यालयाची रितसर परवानगी घेऊन १९९८ च्या परिक्षेस बसलोच नव्हतो. स्थानिक वर्तमान पत्रातील दि. ११.०१.२००२ चा बातमीत डिसेंबर १९९६ चा निकाल खोटा असल्याचे समजले. त्यानंतर आम्ही लगेच निकाल खोटा असल्यास तो रद्द करावा असा विनंती अर्जमा. आयुक्त, मा. उप आयुक्त (म) यांच्याकडे दि. १७.०१.२००२ रोजी सादर केलेला आहे. संदर्भिय नोटीसमध्ये डिसेंबर १९९६ चा फेरतपासणीचा निकाल हा बनावट आहे असा उल्लेख आहे. तसेच सदरची गुणपत्रिका आम्ही दाखल केली आहे असे म्हणणे पुर्णपणे चूकीचे असून वस्तुस्थितीत धरून नाही. सदरच्या फेरतपासणीच्या निकालाच्या अनुषंगाने आम्ही कोणतेही फायदे घेतलेले नसून आम्ही दिलेल्या खुलाश्यावर सहानूभुतीपूर्वक विचार करून आमच्यावर लावण्यात आलेले आरोप रद्द करण्यात यावे अशी विनंती केली आहे. तसेच श्री. एस. व्ही. जेशी, दु.आ. यांनी कार्यालयास सेवा पुस्तिकेत नोंद घेण्यासाठी अर्जसुध्दा सादर केलेला नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

**कार्यालयीन अभिलेख :**

कार्यालयीन अभिलेख तपासले असतांना असे निदर्शनास आले की डिसेंबर १९९५ मध्ये घेण्यात आलेल्या क. अभियंता व्यावसायिक परिक्षेच्या फेरतपासणीचा निकाल अभियांत्रीकी अधिकारी महाविद्यालय नाशिक यांच्या कार्यालयामार्फत दि. ४ एप्रील १९९८ रोजी रितसर टपालाने महानगरपालिका कार्यालयास प्राप्त झालेला आहे. तसेच डिसेंबर १९९६ मध्ये झालेल्या परिक्षेचा फेरतपासणीचा निकाल अभियांत्रीकी अधिकारी महाविद्यालय नाशिक यांच्या मार्फत रितसर टपालाने महानगरपालिका कार्यालयास दि. १२.०१.१९९९ रोजी प्राप्त झालेला आहे.

अभियांत्रीकी अधिकारी महाविद्यालय नाशिक यांना उपरोक्त दोन्ही निकालाची शहानिशा बाबत महानगरपालिका कार्यालयाने विचारणा केल्यानंतर अभियांत्रीकी अधिकारी महाविद्यालय नाशिक यांनी दि. २१.०१.२००२ उपरोक्त १९९५ व १९९६ च्या झालेल्या परिक्षेच्या फेरतपासणीचा निकाल हा बनावट असून महापालिका कर्मचाऱ्यांनी कार्यालयास सादर करून कार्यालयाची फसवणूक केलेली असून त्यांच्या विरूध्द पोलिस कार्यवाही करावी असे कळविलेले आहे.

क. अभियंता व्यावसायिक परिक्षेचा निकाल रितसर टपालाने प्राप्त झालेला आहे की संबंधीतांनी कार्यालयास सादर केला या बाबत सहाय्यक आयुक्त-१ यांना विचारणा केली असतांना त्यांनी दि. ०९.०२.२००५ च्या पत्रान्वये कळविले आहे की, मुख्य अभियंता व प्राचार्य अभियांत्रीकी अधिकारी महाविद्यालय नाशिक यांच्याकडून परिक्षेचा निकाल हा रितसर टपालाने महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे.

बनावट गुणपत्रिका दाखल केल्याप्रकरणी उप विभागीय अभियंता नांदुर मधमेश्वर कॅनाल वैजपूर यांनी श्री. बाबासाहेब वारकर व इतर यांच्यावर फौजदारी गुन्हा क्र. आर.सी.सी. २६२/२००१ दाखल केलेला होता. मा. न्यायालयाने सदरील प्रकरणात सर्व संबंधीतांना निर्दोष मुक्त केलेले आहे.

**निष्कर्ष :**

१) दोषारोप ठेवलेल्या कर्मचाऱ्यांचे जबाब विचारात घेता स्पष्टपणे दिसून येते की, सदरील निकाल हा संबंधीत कर्मचाऱ्यांनी कार्यालयात सादर केलेला नाही.

२) श्री. इखलास सिद्दीकी - क.अ., विनायक बोडस - दु.आ., मंगलसिंग राजपुत-दु.आ, के.जी. दौड- दु.आ., अविनाश जयवळ - दु.आ., सुभाष जेशी - दु.आ. या कर्मचाऱ्यांनी कार्यालयाची पुर्व परवानगी घेऊनच सन १९९८ सालची व्यावसायीक परिक्षा पुनश्च: दिलेली आहे. याचाच अर्थ सन १९९६ साली ते नापास झाल्यामुळे पुनश्च: परिक्षेस बसले हे सिध्द होते. त्यामुळे त्यांचा हेतू चुकीचा नव्हता असे दिसून येते.

३) दोषारोप ठेवलेल्या कर्मचाऱ्यांनी फेर मुल्यांकणाकरीता परिक्षा घेणाऱ्या संस्थेकडे अर्ज केलेले होते, हा त्यांचा न्यायीक हक्क आहे. त्या अर्थी त्यांनीच बनावट गुणपत्रिका सादर केल्या हे सिध्द करण्यास पुरेसे सबळ कारणे तसेच पुरावे उपलब्ध नाही.

४) अशाच प्रकरणात बनावट गुणपत्रिका दाखल केल्याप्रकरणी उप विभागीय अभियंता, नांदुर मधमेश्वर कॅनाल वैजपूर यांनी श्री. बाबासाहेब वारकर व इतर यांच्यावर फौजदारी गुन्हा क्र. आर.सी.सी. २६२/२००१ दाखल केलेला होता. यामध्येही मा. न्यायालयाने परिस्थितीजन्य पुरावे विचारात घेऊन आरोपींना निर्दोष मुक्त केले आहे.त्या निकालाची प्रत सदरील चौकशी कामी

मार्गदर्शन म्हणून वापरली असून अवलोकनार्थ सोबत जेडली आहे.

५) महानगरपालिका कार्यालयाने सदरील व्यावसायिक परिक्षा उत्तिर्ण झाल्याचे गृहित धरून त्याचे फायदे कर्मचाऱ्यांना दिले होते. ते फायदे कार्यालयाने परत घेतले असून प्राप्त निकालाच्या सेवा पुस्तिकेत घेतलेल्या नोंदी रद्द केल्याचे अभिलेख तपासण्याअंती निदर्शनास आले आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे कोणत्याही प्रकारचे आर्थिक नुकसान झालेले नाही.

वरील सर्व मुद्यांचा विचार करता व प्रकरणातील अतिविलंब विचारात घेता सदरील कर्मचाऱ्यांना दोष मुक्त करण्यात यावे, कोणत्याही चौकशी प्रकरणात Limitation Act नुसार ३ वर्षाच्या आत कार्यवाही करणे अपेक्षित असते. सदरील प्रकरण १९९६ सालचे असून १९९९ पासून प्रलंबीत आहे, ही बाब विचारात घेता न्यायीक दृष्ट्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करणे उचित ठरत नाही. सबब दोषारोप ठेवलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना दोषमुक्त करण्यात यावे अशी शिफारस करण्यात येते. त्याच प्रमाणे अभिलेख तपासणीअंती काही कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तिकेतील १९९५ व १९९६ च्या व्यावसायिक परिक्षेच्या फेरतपासणी निकालाच्या नोंदी रद्द केलेल्या नाहीत असे निदर्शनास आलेले आहेत, त्या नोंदी रद्द करण्यात याव्यात.

उपआयुक्त(प्रशासन) : सर्वसाधारण सभेच्या निर्णयानूसार सदरील कर्मचाऱ्यानी जे फायदे घेतलेले असतील ते काढून घेवून त्यांचेवर फौज्दारी गुन्हे दाखल करू नये असा निर्णय घेतलेला होता.हा घेतलेला निर्णय शासनाकडे पाठविण्यात आला व शासनाने २ एप्रिल २००४ रोजी निर्णय दिला.तो प्रस्ताव विखंडीत केला .

मा.सभापती : सर्वसाधारण सभेने निर्णय दिल्यानंतर हा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यापूर्वी त्यावेळी जेमा.महापौर होते त्यांचेशी चर्चा केलेली होती का ?

उपआयुक्त(प्रशासन) : शासनाने या संबधी माहिती मागविलेली होती.

श्री.बारवाल गजनन :न्यायालयात हे प्रकरण चालू आहे, न्यायालय निर्णय देईल तेंव्हा देईल तोपर्यंत त्यांना कामावर घेण्यात यावे.

श्री.रेणूकादास वैद्य :चौकशी अधिकारी येथे आहे त्यांचे मत घेण्यात यावे.

सौ.लता दलाल :शासनाकडे प्रस्ताव जेंव्हा पाठविला तेंव्हा व्यवस्थित माहिती देण्यात आलेली होती का, या कर्मचाऱ्यावर कार्यवाही केलेली आहे. त्यांचे सवलती काढून घेतलेल्या आहे. त्यांना जी वेतनवाढ देण्यात आलेली आहे ती रद्य केली अशी माहिती दिलेली होती का, शासनाकडे प्रस्ताव दिला आणि लगेच विखंडीत कसा होतो. या महानगरपालिकेत अशी अनेक प्रकरणे झालेली आहेत. त्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत का पाठविलेले नाही? मा.महापौरांनी निर्णय घेतल्यानंतर शासनाकडे हा प्रस्ताव पाठविण्यापूर्वी मा.महापौरांशी तत्कालीन आयुक्त यांनी चर्चा केलेली होती का?

मा.आयुक्त : शासनाकडे इतर महानगरपालिका सहीत अशी १९ लोकांची प्रकरणे होती. त्यात काही महानगरपालिकेचे अधिक्षक अभियंता सुध्दा होते. जे की त्यांनी चुकीची माहिती दिलेली होती. या १९ लोकांवर पोलीसात गुन्हे दाखल करावे असे शासनाने निर्देश दिलेले होते. त्यानंतर ठराव झालेला आहे की गुन्हे दाखल करण्यात येवू नये.त्यानंतर शासनाकडे पाठविण्यात आले. शासनाचे पूर्वीच आदेश होते आपण पाठविलेला ठराव रद्द केलाच शिवाय असे आदेश केले की बनावट गुणपत्रिका बाबत आपल्या नियंत्रणाखाली जेकर्मचारी दोषी आहे त्याचेवर संबधीत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात यावी.पोलीसात गुन्हा दाखल केला नाही व त्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केल्यास आपणा विरूध्द म्हणजे संबधीत जे कुणी आयुक्त असतील ते,शिस्तभंगाची कार्यवाही करणे भाग पडेल याची दखल घ्यावी.यावर चार्जशिट सुध्दा झालेले आहे असे वाटते.

श्री.अजीजजगीरदार :न्यायालयात प्रकरण चालू आहे अशा प्रकरणामधे या सभागृहात चर्चा करता येत नाही.कोर्टाचा जे निर्णय लागेल त्यास बंधनकारक रहावे लागेल.

मा.सभापती :कोर्टाच्या विरूध्दात आपण बोलत नाही कोर्टाचा निर्णय आपणला मान्य राहील.

सौ.लता दलाल :शासनाचे आदेश फक्त गुन्हा दाखल करावा म्हणून होते त्यांना तडकाफडकी कामावरून काढावे असे नव्हते.शासनाचे आदेश सभागृहात वाचून दाखवावे.

श्री.विनायक पांडे :यात वैजपूर न्यायालयाचा निकाल आहे की संबधीत कर्मचाऱ्यावर गुन्हा सिध्द होवूच शकत नाही त्या संबधीचे पत्र सोबत दिलेले आहे.

मा.आयुक्त :जे कर्मचारी होते ते २४ तासापेक्षा जस्त काळ पोलीस कस्टडीत होते त्यांना कामावर घेण्याचा प्रश्नच येत नाही. कोर्टात जी परीस्थिती आहे त्यांचा अहवाल सादर केलेला आहे खातेनिहाय चौकशी झाली त्यांचाही अहवाल सादर झालेला आहे.याचे संपूर्ण अवलोकन केल्यानंतर आज रोजी महानगरपालिकेत कर्मचाऱ्याची कमी संख्या त्यामूळे काम करण्यास लागत असलेला वेळ या व इतर सर्व बाबी तपासून या बाबतीत आयुक्त यांनी यामध्ये योग्य ती कार्यवाही करावी. चांगले कामकाजहोण्याच्या दृष्टीकोनातून इतर कर्मचाऱ्याच्या बाबतीत जी काही भुमिका घेतलेली आहे आणि इतर महानगरपालिकेत या संबधीची काय परीस्थिती आहे त्या महानगरपालिकेने अशा कर्मचाऱ्याच्या बाबतीत काय निर्णय घेतलेला आहे त्या प्रमाणेच याही महानगरपालिकेतील या कर्मचाऱ्याच्या बाबतीत निर्णय घेण्याबाबत कार्यवाही करावी.

श्री.बारवाल गजनन : त्या कर्मचाऱ्याना ७५ टक्के पगार दिला जतो त्यांचेकडून काम करून घ्यावे .

मा.सभापती :सर्व कायदेशीर बाब तपासून मा.आयुक्त यांनी निर्णय घ्यावा.

(यानंतर महानगरपालिकेचे मा. आरोग्य वैद्यकीय अधिकारी श्री. काळे साहेब हे सेवानिवृत्त होत असल्याने त्यांचे मा.सभापती यांनी सभागृहाच्या वतीने पुष्पगुच्छ देवून स्वागत केले व मा.सभापती व स.सदस्य यांनी चांगल्या कामाबाबत प्रशंसा केली व कामाचे कौतूक केले.तसेच मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी सुध्दा महानगरपालिकेची सेवा करतांना प्रशासनातील अधिकारी/कर्मचारी तसेच येथील सर्व पदाधिकारी व स.सदस्यांनी जे सहकार्य केले त्याबध्दल अभिनंदन केले.व त्यांनी त्यांचे सेवेच्या कार्यकाळासंबधी मत व्यक्त केले.)

श्री.दिलीप गायकवाड : ज्या नगरसेवकाचे जतीचे प्रमाणपत्र रद्द झाले त्या संदर्भात न्यायालयाने दंडात्मक कार्यवाही म्हणून जेमानधन उचलले ज्या सवलती फायदे घेतले.ते वसूल करावे या बाबतीत आतापर्यंत काय कार्यवाही करण्यात आलेली आहे.

मा.सभापती :ज्या नगरसेवकांचे नगरसेवक पद न्यायालयाच्या निर्णयानुसार रद्द झालेले आहे त्या नगरसेवकाकडून त्यांनी जे जे आर्थीक फायदे घेतले असेल ती वसूली प्रशासनाने केलेली आहे. ज्यांचेकडून वसूल केलेले नसेल त्याबाबतीत नियमाप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री.मिलींद दाभाडे : नारेगाव येथील कचरा डेपोची जगा सत्यम फर्टीलायझरचे मालक श्री.चांडक यांनी उपआयुक्त याची बोगस सही करून अकोला अर्बन को-ऑपरेटीव्ह बँकेला जगा गहान ठेवून ५० लक्ष कर्जघेण्याचा प्रयत्न केलेला आहे .त्यांचे विरूध्द गुन्हा दाखल झालेला होता परंतू त्यांचे कडे जे रॉयल्टी होती तीत्यांनी भरणा केलेली नाही म्हणून त्यांची मालमत्ता जप्त करण्यात यावी व रॉयल्टी वसूल करण्यात यावी अशी विनंती आहे.

मा.सभापती :सत्यम फर्टीलायझरचे मालक श्री चांडक यांचेवर जे कार्यवाही करण्यात आलेली होती .आजची परीस्थिती काय आहे याची माहिती देण्यात यावी.

आरोग्य वैद्यकीय अधि. :सत्यम फर्टीलायझरचे मालक श्री चांडक यांचे विरूध्द गुन्हा दाखल करून कोर्टामधे प्रकरण चालू आहे.५९लक्षवर रिकव्हरी काढलेली आहे. त्यावर केंद्र शासनामार्फत ५० लक्ष श्री चांडक यांना अनुदान मिळणार होते ते थांबविण्यात आलेले आहे. न्यायालयाचा जे निकाल लागेल त्या अनुषंगाने त्यांचेवर कार्यवाही होईल. अर्बीट्रेटरकडे प्रकरण आहे.

मा.सभापती : कायदेशीर बाब तपासून आणखी काही त्या व्यतिरिक्त त्यांनी जे मालमत्ता महानगरपालिकेकडे ठेवलेली असेल या संदर्भात काही कार्यवाही करता येत असेल तर ती करावी .

श्री.रेणूकादास वैद्य :बीओटी पध्दतीनेकाही जगा विकास करण्यासाठी देणार असा ठराव आपण बजेटमधे मंजूर केलेला आहे त्यास ज्या पध्दतीने चालना मिळावयास पाहिजेहोती त्याप्रमाणे कार्यवाही होत नाही. याबाबत कार्यवाही तात्काळ होण्याच्या दृष्टीने सुचना देण्यात याव्या.

श्री.बारवाल गजनन :बीओटी पध्दतीने यापूर्वी ज्या जगा विकास करण्यासाठी देण्यात आलेल्या होत्या त्यातील महानगरपालिकेचा हिस्स्यातील जगा महानगरपालिकेने अदयाप ताब्यात घेतलेल्या नाही.काही ताब्यात घेवून ज्या प्रमाणे त्याचा विनियोग करावयास पाहिजे होता तो करीत नाही.याकडे प्रशासनाने लक्ष दयावे अशी विनंती आहे.

श्री.जगीरदार अजीज :बीओटी पध्दतीने विकास कराण्या संदर्भात अदयाप कोणतीच कार्यवाही केलेली नाही.तसेच डिफर्ट पेमेन्टवर संदर्भात सुध्दा प्रशासनाने कार्यवाही केलेली नाही. त्यात कोणकोणते रस्ते येणार आहे.ते होणार आहे किंवा नाही याबद्दल शंका येते.

मा.सभापती :या संदर्भात मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :बीओटी पध्दतीने काम करतांना प्रत्येक वेळेस धोरणात्मक निर्णय घ्यावा लागतो.ती जमीन त्या व्यक्तीला १५ ते २० वर्षासाठी वापर करण्यासाठी द्यावी लागते त्यानंतर ट्रान्सफर करावे लागते प्रत्येक प्रपोजलसाठी सर्वसाधारण सभेसमोर जवे लागते. पहिल्यांदा सर्वसाधारण सभेसमोर जते त्यानंतर टेंडर काढून पून्हा स्थायी समिती कडे येणार. फायनल त्या व्यक्तीच्या नावाने जगा नावावर

करणयासाठी पून्हा सर्वसाधारण सभेसमोर जणार, काही महानगरपालिकेत तात्काळ कार्यवाही होण्यासाठी सेक्शन ३० च्या नुसार स्पेशल कमेटी तयार होते सर्वसाधारण सभेची मान्यता लागत नाही सर्वसाधारण सभेत त्यांस प्रथम अधिकार देते त्यानंतर प्रोसेस सूरू होते कमेटी करण्यासाठी ऑलरेडी प्रस्ताव ठेवलेला आहे सभा तहकूब केली म्हणून ऐनवेळी होता. सादर करू शकलो नाही याही सर्वसाधारण सभेत तो ठेवला गेला नाही माहिती मागविली होती त्यास उशीर झालेला होता. या विशेष कमेटी मधे सर्व पदाधिकारी .आयुक्त. तसेच शहर अभियंता व मालमत्ता अधिकारी असेल मान्यता मिळाल्यानंतर प्रशासन टेडर काढेल स्थायी समीती समोर येईल त्यानंतर अंतिम निर्णयासाठी सर्वसाधारण सभेसमोर जईल डिफर पेमेन्टच्या बद्दल प्रथम पीएमसी नेमावायचे. पुढील स्थायी समिती समोर रस्त्याचे संदर्भात पीएमसी नेमण्याचा प्रस्ताव सादर होईल.

श्री.बारवाल गजनन :आताच मा.आयुक्त यांनी असे सांगितले की बीओटी पध्दतीने काम करण्यासाठी एक समिती स्थापन करायची आहे .हा विषय स्थायी समितीपुरता मर्यादित ठेवला तरी खूप आहे.त्यासाठी विशेष कमेटी स्थापन करण्याची गरज नाही कारण नियमित बैठका स्थायी समितीच्या व सर्वसाधारण सभेच्याही होतात.नगरसेवकांच्या अधिकारावर गदा येण्याची शक्यता दिसते.योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

श्री.रेणूकादास वैद्य :ही कार्यवाही तात्काळ होण्यासाठी माझे असे मत आहे की इतर प्रोसेस न करता मा.आयुक्त यांनी त्यांचे अधिकारात निर्णय घ्यावेत.

मा.सभापती :बीओटीच्या बाबतीत कायदयामधे जे काही तरतूद असेल त्या संदर्भात मा.महापौर यांचेशी चर्चा करून या सभागृहाला अधिकार देवून व सर्वसाधारण सभेचे सर्व अधिकार अबादित ठेवून या बाबतीत काम त्वरीत होण्याच्या दृषटीकोनातून निर्णय घेतला जईल.प्रशासनाने या बाबतीत संचिका तयार करून पूढील कार्यवाही करावी ठरावास मंजूरी मिळाल्यानंतर निविदा वगैरे जे काढव्या लागतात त्याप्रमाणे कार्यवाही करावी.त्याच प्रमाणे बस सेवेच्या बाबतीत खुलासा करावा.

मा.आयुक्त :बस सेवेच्या बध्दल विचार होत आहे.सर्व काही कार्यवाही झालेली आहे.एक दोन दिवसात टेंडर येईल. थांबे निश्चित करण्याची कार्यवाही होणार आहे.बस सेवेचे रूट पण डिसाईड झालेले आहे.

मा.सभापती :महानगरपालिकेच्या संदर्भात कचरा उचलला जतो हया बातम्या येत नाही. बॅगमधून कचरा पडतो ही बातमी येते. ५ वाजता शहरात मी फिरतो सर्व ठिकाणी पाहणी करतो कचरा गाडया वाढविण्यात आलेल्या आहे. अशा बातम्या येत नाही.

श्री.बारवाल गजनन :शालेय विदयार्थ्यांना गणवेश पासून वंचित रहावे लागते ठराव झाला सर्व काही झाले कार्यवाही का होत नाही तात्काळ निर्णय घ्यावा.मागिल वेळेस पदमपूरा येथील शाळेत शिक्षकांनी पैसे जमा करून गणवेश वाटप केले.ही खेदजनक बाब आहे.

मा.सभापती :या बाबतीत वारंवार चर्चा होत आहे.हे योग्य नाही.प्रशासनाने या बाबतीत तात्काळ कार्यवाही करावी व शालेय विदयार्थ्यांना गणवेश कसे लवकर दिले जईल याची दखल घ्यावी.स.सदस्य श्री जगीरदार यांनी सुचना केली की डिफर पेमेन्टच्या बाबतीत वेगळा प्रस्ताव येण्याची आवशकता नाही .पाणी आणि ड्रेनेज

च्या साठी जी परवानगी दिलेली आहे त्यामधेच ही रस्त्या संदर्भात एजन्सी काम करेल.फक्त दराच्या बाबतीत निर्णय घ्यावा लागेल.

**विषय क्र. ४९ :**

दिनांक ६/७/२००५ व १२/७/२००५ (का.प.क्र.५) रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.रेणूकादास वैद्य :मागिल बैठकीत पेट्रोल भत्ता संदर्भात चर्चा झालेली होती त्या संबधीचा अहवाल सादर करणार होते तो आलेला नाही.प्रत्येक बैठकीत अहवाल मागविण्यात येतात परंतू अहवाल सादर होत नाही यापूढील बैठकीत यापूर्वी जेजेअहवाल मागविण्यात आलेले आहे ते ठेवण्याचे आदेश दयावेत. नुसती चर्चा करून अर्थ नाही.तशा सुचना देवून विषय क्र ४९ मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती :यापूर्वी जेजेअहवाल मागविण्यात आलेले आहे ते सर्व अहवाल पूढील बैठकीत मा.उपआयुक्त , प्रशासन व महसूल यांनी त्यांचे संबधीत विभागाकडून मागवून कार्यवाही होण्याच्या दृष्टीने सादर करावेत पूढील बैठकीत त्यावर चर्चा करता येईल विषय क्र.४९ सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक ६/७/२००५ व १२/७/२००५ (का.प.क्र.५) रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५० :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये सर्व विभागीय कार्यालये व सर्व जकात नाक्यांवरील रोकड व धनादेशाचे संकलन महानगरपालिकेच्या रोखपालामार्फत करण्यात येत आहे. या संकलनाच्या कामासाठी रोखपालासमवेत एक सुरक्षा रक्षक व एक शिपाई असे तीन कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले आहे. सर्व विभागीय कार्यालय व सर्व जकात नाक्यावरील रक्कम संकलन करण्यासाठी महानगरपालिकेचे वाहन सुध्दा पुरविण्यात आले आहे. कर्मचारी वेतन व वाहन इंधन व दुरूस्तीसाठी प्रतिमाह सरासरी रू.४१०००/- खर्च महानगरपालिकेस करावा लागत आहे. या प्रतिमाह होणाऱ्या खर्चात कपात व्हावी म्हणून औरंगाबाद शहरातील विविध बँकांना कॅश कलेक्शन संदर्भात त्यांचे प्रस्ताव सादर करणे बाबत कळविण्यात आले होते. त्यापैकी आयसीआयसीआय बँक, इन्ड्युसइंड बँक, आयडीबीआय बँक यांनी जकात, मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुलीचे कॅश कलेक्शन करून महानगरपालिकेच्या युनायटेड वेस्टर्न बँकेतील खात्यावर रक्कम जमा करणे बाबत प्रस्ताव सादर केले आहे. ते खालील प्रमाणे :

१. आयसीआयसीआय बँकेने जकात व विभागीय कार्यालयाचे कॅश व चेक केलेक्शन विना मुल्य संकलन करण्याची तयारी दर्शविली आहे. तर आयडीबीआय बँकेने यासाठी शुल्क आकारले आहेत. इन्ड्युसइंड व युटीआय बँकेने जकात नाक्याचे कॅश व चेक कलेक्शन करण्यास असमर्थता दर्शविली आहे.

आयसीआयसीआय बँकेस जकात नाक्याचे चेक व कॅश कलेक्शनचे काम देण्यासाठी महानगरपालिकेच्या नांवे आयसीआयसीआय बँकेत खाते उघडावे लागेल, कॅश कलेक्शनची रक्कम त्याच दिवशी महानगरपालिकेच्या युनायटेड वेस्टर्न बँकेतील मुळ खात्यावर आयसीआयसीआय बँक जमा करील तर धनादेश वटल्यानंतर युनायटेड वेस्टर्न बँकेत महानगरपालिकेच्या खातील जमा होईल. यासाठी स्थानिक धनादेशाकरिता तीन दिवस व बाहेरगांवच्या धनादेशाकरिता सात दिवसाचा कालावधी द्यावा लागणार आहे.

२. मालमत्ता कर, पाणीपट्टीचा भरणा बँकेत नागरीकांनी प्रत्यक्ष जऊन केल्यास नागरीकांना ापावती देणे, पावतीची रक्कम महानगरपालिकेकडे वर्ग करणे, दररोज एमआयएस देणे या बाबतची कामे बँकेमार्फत होतील. यासाठी बँकांनी खालील प्रमाणे दर आकारले आहे.

| अ.क्र. | बँकेचे नांव | मालमत्ता व पाणीपट्टही प्रती बील दर |
|---|---|---|
| १ | इन्ड्युसइंड बँक | रोख रक्कमेचा भरणा बाबत प्रती बील रू.४.०० धनादेशाद्वारे भरणा बाबत प्रती बील रू.२.०० |
| २ | आयसीआयसीआय बँक | रोख रक्कम व धनादेशाद्वारे भरणा बात प्रती बील रू.५.०० |

टिप:- आयसीआयसीआय बँकेचे प्रतिनिधी श्री.सचीन पुरोहित यांनी समक्ष इन्ड्युसइंड बँकेने दिलेल्या दराने मालमत्ता व पाणीपट्टी कराचे आयसीआयसीआय बँकेमार्फत कलेकशन करण्यास संमती दर्शविली आहे.

करिता सर्व जकात नाक्याचे कॅश व चेक कलेक्शन आयसीआयसीआय बँकेमार्फत तर मालमत्ता व पाणीपट्टी कराचे कॅश व चेक कलेक्शन आयसीआयसीआय बँक व इन्ड्युसइंड बँक यांच्यामार्फत करण्यासाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.बारवाल गजनन :जकातीचे पैसे बँकेकडे जमा करण्या संदर्भात प्रस्ताव आहे.माझ्या माहिती प्रमाणे आयसीआयसीआय ही बॅक पूर्णत: कमर्शियल आहे त्या बँकेशी असा व्यवहार महानगरपालिकेने करू नये .या बँकेचे काम वेगळे आहे पूर्णपणे त्यांचे काम बघीतले तर कमर्शियल पधदतीने चालते . परंतू हे काम ते विना मोबदला का करतात.या मागची भुमिका काय आहे.युनायटेड बँकेला महानगरपालिकेने जगा दिली ती बॅक का असा व्यवहार करीत नाही किवा इतर बँका का समोर येत नाही म्हणून हा विषय रद्य करावा अशी विनंती आहे.

श्री.जगीरदार अजेज :या बँकेकडे नगरेवका मार्फत कर्ज देण्या संदर्भात शिफारस केल्यास संचिका बाजूला करतात.त्यांना महानगरपालिकेच्या नगरसेवक व राजकीय व्यक्ती विषयी आदर नाही.

श्री.बारवाल गजनन :राजकीय व्यक्तींना ही बँक जवळ करीत नसेल तर असे व्यवहार करू नये.कोणतीही राष्ट्रीय भुमिका त्यांचेकडे नाही.असे माझे स्पष्ट मत आहे.

श्री.रेणूकादास वैद्य :शहरात ज्या काही राष्ट्रीयकृत बँका आहेत त्यांचेकडून या बाबतीत प्रस्ताव मागवून घ्यावे जे महानगरपालिकेला योग्य वाटेल ते मंजूर करावे.याच बँकेला का संधी देण्यात येते.

मा.सभापती :मुख्यलेखाधिकारी यांनी या संदर्भात सविस्तर खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी :आयसीआयसीआय बँकेला सार्वजनिक क्षेत्रात व्यवहार करण्यासाठी रिझर्व बँकेने परवानगी दिलेली असून आयसीआयसीआय बँकेमार्फत अशा पध्दतीचे कामकाज मुंबई,ठाणे ,पूणे,महानगरपालिका सर्व मोठया महानगरपालिकेतून या बँकेला कॅश कलेक्शनसाठी काम दिलेले आहे दिल्ली महानगरपालिकेचे काम सुध्दा हीच बँक करते.मोफत सेवा देण्याचे कारण म्हणजे रोटेशन पध्दतीने जे रोलींग उत्पन्न मिळते त्यातून हे व्यवहार करतात त्यामूळे महानगरपालिकेला मोफत सेवा देतात.इतर महानगरपालिकेला अशा प्रकारच्या सुविधा दिलेल्या आहेत.नॅशनलाईज बँक व शेडयूल बँक अशा प्रकारची सुविधा देत नाही त्या बँकाशी चर्चा केलेली होती कोणतीही बँक मोफत सेवा देण्यास तयार नाही.

महानगरपालिकेला कॅश कलेक्शनसाठी दर महिण्याला ४१ हजर रूपये खर्च येतो बँकेमार्फत कलेक्शन करणार म्हणजेबँकेत डायरेक्ट पैसे जमा होणार आहे.जे कॅश जमा करायची आहे त्या संदर्भात युनायटेड वेस्टर्न बैकेत खाते आहे.तेथे जमा करणार. लोकल चेक दोन तीन दिवसानंतर आणि ७ दिवसानंतर ट्रांझेंट त्यांचे खातेमधे जमा करून महानगरपालिका म्हणून महानगरपालिकेच्या बँकेत डिपॉजेट करणार आहे प्रशासकीय दृष्टीकोनातून सोयीचा प्रस्ताव आहे मान्यता देण्यात यावी.

श्री.बारवाल गजनन :मोफत सेवा ही बँक देत नाही रोटेशन पध्दतीने काम करायचे कुठेतरी महानगरपालिकेचे नाव लागले पाहिजे या नुसार ते काम करीत आहे.युनायटेड वेस्टर्न बॅकेला महानगरपालिकेने सुविधा दिलेल्या आहे ती बँक अशी सेवा देत नसेल तर त्यानंतर यावर विचार करावा हे टेंडर रिकॉल करावे पुन्हा प्रस्ताव सादर करण्याचे सुचना दयाव्यात अशी विनंती आहे.

मुख्यलेखाधिकारी :युनायटेड वेस्टर्न बँकेलाही विचारणा करण्यात आलेली होती अशा पध्दतीने सुविधा देण्यात तयार नाही.नॅशनलाईजव शेडयूल बँकेशी विचारणा केलेली आहे अशी सुविधा देण्यात तयार नाही इतर शासकीय कार्यालयात किंवा महानगरपालिकेत ज्या बँक सुविधा देतात त्याचेशी चर्चा करून अशा पध्दतीने प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.आयुक्त :सध्याची परीस्थिती अशी आहे की आपले कर्मचारी सर्व नाक्यावर जतात कॅश घेतात तसेच वार्ड कार्यालयात जतात कॅश घेतात व ती रक्कम एकत्रित करून मोजवी लागते व त्यानंतर बँकमधे ठेवली जते. दुसरे असे की ट्रांझीटमध्ये चोरी वगैरे होण्याची भिती असते जेवढी रक्कम जमा होते तेवढी रक्कम केंव्हा केंव्हा पूर्णपणे जमा होत नाही. बँके मार्फत रक्कम भरणा झाली तर कोणत्याही नाक्यावर किती रक्कम मिळाली याची पावती देणार त्यावेळी बँकेला पूर्ण पैसे दयावेच लागतील कोणत्याही प्रकारची अफरातफर होणार नाही. ट्रान्झीटमध्ये जेंव्हा दोन तीन तास कर्मचारी शहरात फिरतात.प्रत्येक दिवशी जवळपास २० लक्षचे कलेक्शन आहे.इतर १ ते २ लक्ष असे २० ते २२ लक्ष रूपये घेवून फिरणे हे आपल्या कर्मचाऱ्यासाठी एक जबाबदारी आहे. बँकेमार्फत ही सेवा चांगली आहे. मोफत कुणी सेवा देत नाही व देवू नये या मताचा मी आहे. रोटेशन मधे ते फायदा करून घेत असतील महानगरपालिकेचे यात काहीही नुकसान होणार नाही.

श्री.बारवाल गजनन :आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आलेलो आहेत. जे बँक आमचा आदर करीत नाही त्यांचेशी महानगरपालिकेने व्यवहार करू नये.अशी आमची भावना आहे.

मा.आयुक्त या बँकेला निवडण्याआधी सर्व को ऑपरेटिव्ह बँकेला बोलवणार नाही. त्यांचेकडे एकही दिवसही पैसा त्यांचेकडे राहणार नाही.ज्या शेडयूल बँक आहे महानगरपालिकेची युनायटेड वेस्टर्न बँकेस विचारणा केली ते करण्यास तयार नाही.दुसरी कोणतीही बँक करण्यास तयार नाही. दुसरी बँक निवडू शकता परंतु बँके मार्फतच कलेक्शन करणे योग्य होईल.याच ठरावामधे मालमत्ता कर व पाणीपट्टी कर जे आहे तोही बँके मार्फतच कलेक्शन करण्याचा आहे आपले जे काही कर्मचारी असतात त्यांचा वेळ जतो त्यांना ३-३ तास बसावे लागते. या बाबतीत कलेक्शनसाठी सर्वात कमी इन्डयुसंईड बॅकेचे आलेले आहे या बँकेने

ज्या दराने करण्यास जी बँक तयार असेल त्यांना देवू शकतो.एखादया व्यक्तीने चेक दिला आणि तो बॉऊन्स झाला त्यानंतर केस होते १५ दिवस जतात.बॅकेमार्फत कलेक्शन केल्यास कुणी चूकीचा चेक दिला तर बँक त्यांचे अधिकार वापरून कार्यवाही करेल.जे कुणी चेक देणार त्यांना बँकची पावती मिळणार बँक प्रत्येक दिवशी महानगरपालिकस रक्कम जमा करेल. यात दोन प्रकार येतात नाक्यावरून कलेक्ट करण्याचा दुसरे असे की जे व्यक्ती डायरेक्ट बॅकेमधे जवून कर भरतील त्यांना पावती बँक देईल.यामूळे जे कर्मचारी कामास लागतात त्यांचा पगार वाचेल. फायदा महानगरपालिकेस होईल.

श्री.बारवाल गजनन :ही बँक सेवा देणार आहे हे सर्व आपणास माहित आहे परंतू ही कमर्शियल बँक आहे या बँकेशी महानगरपालिकेने व्यवहार करू नये अशी विनंती आहे.जे बँक तिरस्कार करते त्यांना असे व्यवहार देवू नये.इतर बँकेकडून माहिती घ्यावी तशा सूचना आपण दयाव्यात अशी विनंती आहे.

श्री.दिलीप गायकवाड :महानगरपालिकेचे संपूर्ण खाजगीकरण करण्याचा विचार प्रशासनाचा आहे काय.ज्या पध्दतीने कलेक्शन होते त्याच प्रमाणे ठेवावे बँकेला असे व्यवहार देवू नये.

मा.आयुक्त : प्रशासनाच्या दृष्टीने प्रस्ताव योग्य आहे मान्य करावे किंवा नाही हा सभागृहाचा अधिकार आहे. दुसरी कोणतीही बँक मोफत सेवा देण्यास तयार नाही.

श्री.रेणूकादास वैद्य : प्रस्ताव चांगला आहे फक्त या बँकेला व्यवहार देवू नये अशी सर्वाची मागणी आहे.

मा. सभापती : प्रशासनाचा दृष्टीकोन खर्च वाचविण्याचा असून प्रस्ताव चांगला आहे. यात फक्त आयसीआयसीआय बँक नमूद केलेली आहे. स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता युनायटेड वेस्टर्न बँकेला मनपाने जगा दिलेली आहे. अशा प्रकारे सिडकोमध्ये स्टेट बँक ऑफ इंडियास जगा देण्यात आली. कोणतेही चार्जेस न आकारता चलन भरून दिल्यानंतर विनामुल्य स्विकारले जत होते. ती बँक चांगली सुविधा देत होती. आजही ती बँक सिडको कार्यालयाशी निगडीत आहे. म्हणून सूचना करतो इतर बँकांशी चर्चा केली आहे, जनहित लक्षात घेता तसेच स्वदेशीचा मुद्दा उपस्थित केला. कायदेशीर व मनपाचे हित जेपासणार असेल तर त्या दृष्टीकोनातून विचार करावा पुन्हा चाचपणी करावी. युनायटेड वेस्टर्न बँकेशी आपण संबंध ठेवले पाहिजेही भूमिका आपली आहे. जर इतर विविध बँकांशी चर्चा करावी व त्या बँका अशी सेवा देण्यास तयार असतील तर तशी कार्यवाही करावी. यात दोन बाबी नमूद आहेत. दुसरी इन्ड्युसइंड बँक रोख रकमेचा भरणा प्रती बील रू.४.०० व धनादेशाद्वारे भरणा प्रती बिल रू.२.०० असे दर्शविले आहे. एखाद्या मालमत्ता धारकाचे कुठल्याही बँकेत खाते असेल तर त्या नागरीकास कर भरण्यासाठी महापालिका कार्यालयात येण्याची गरज भासणार नाही. त्यात नागरीकांचा वेळ वाचेल त्या दृष्टीकोनातून सकारात्मक असा हा प्रस्ताव आहे. जे बँक या दराने कलेक्शन करण्यास तयार असेल व यासाठी ज्या ज्या बँका समोर येतील त्यांचा विचार व्हावा. त्यानुसार कार्यवाही करावी. यास अनुसरून हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये सर्व विभागीय कार्यालये व सर्व जकात नाक्यांवरील रोकड व धनादेशाचे संकलन करण्याकरीता सर्व जकात नाक्याचे कॅश व चेक कलेक्शन आयसीआयसीआय बँकेमार्फत विनामुल्य तर मालमत्ता व पाणीपट्टी कराचे कॅश व चेक कलेक्शन आयसीआयसीआय बँक व इन्ड्युसइंड बँक यांच्यामार्फत, रोख रकमेचा भरणा प्रती बील रू.४.०० व धनादेशाद्वारे भरणा प्रती बिल रू.२.०० या दराने करण्यास मान्यता देण्यात येते. तथापी सदरचे काम प्रस्तावित बँकाना देण्यापुर्वी याच दराने कॅश संकलनाचे काम करण्यास शहरातील इतर शेड्युल्ड किंवा राष्ट्रीयीकृत बँका तयार असतील तर त्यांचेशी चर्चा करून त्यांचा देखील विचार व्हावा. यास अधिन राहून सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री.बारवाल गजनन : युनायटेड बेँकेत महानगरपालिकेने डिपॉझिट ठेवलेले आहे सेवा देत नसेल तर व आपणास ही काही सांगण्याचा अधिकार असतो.परवानगी दिलेली आहे हक्काने बोलू शकतो. पुन्हा एक संधी युनायटेड वेस्टर्न बँकेला दयावी अशी विनती आहे.

श्री.रविकान्त गवळी :लेखा विभागातील कर्मचारी महानगरपालिकेच्याच कर्मचाऱ्याचे सी टी डी चे पैसे जमा करतात त्या पैशावर कमीशन या महानगरपालिकेतील अधिकारी घेतात.त्यामूळे मुद्दामहून त्याच बँकेचे नमूद केलेले आहे.

मा.सभापती :सर्व विभाग प्रमुख या ठिकाणी उपस्थिती आहे आपआपल्या विभागातील कर्मचारी हे कार्यालयीन कामा व्यतिरिक्त इतर काही काम करतांना आढळून आल्यास किंवा फिरतांना आढळून आल्यास उपआयुक्त ,प्रशासन व उपआयुक्त ,महसूल यांनी त्वरीत त्या कर्मचाऱ्या विरूध्द कार्यवाही करावी.कार्यालयात नोंद रजिस्टर ठेवण्यात यावे नोंद करून कर्मचारी कामा निमित्त बाहेर गेलेले असेल तर त्याचेवर नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. स.सदस्य श्री गवळी यांचे प्रश्नाचा खुलासा मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी :स.सदस्य यांनी जे प्रश्न उपस्थित केला त्या संदर्भात बँकेशी व्यवहार नसून सीटीडी खाते आहे याचा व्यवहार हा पोस्टा मार्फत होतो.त्यामूळे यामधे कोणत्याही बँकेचा संबध येत नाही.पोस्टाची जी योजना आहे की जे शासकीय कार्यालये निमशासकीय कार्यालये यामधे जे सीटीडी नावाने अल्प बचत खाते आहे या खात्यावर जस्तीत जस्त रक्कमा जमा करावी हे शासनाचे धोरण आहे . आणि जे कर्मचारी त्या संबधी काम करतो त्यांना इन्सेन्टयूव हा पोस्टा मार्फत लिगल स्वरूपात दिला जतो.त्यानुसार एक शिक्षण विभागातील व एक लेखा विभागातील कर्मचारी यांना दिला जतो.

मा.सभापती :पूर्वी ज्या प्रमाणे कार्यवाही होत होती त्याप्रमाणे करावी एक वैयक्तिक कर्मचारी न नेमता पूर्वीप्रमाणे चालू ठेवावे ज्यांचे खाते आहे त्यांना पुन्हा पुन्हा या कार्यालयात यावे लागते आल्यानंतरही पूस्तक त्यांना वेळेवर मिळत नाही स्वच्छ प्रशासन जरी असेल तर तरी संबधीत व्यक्ती योग्य प्रकारे काम करीत नसेल म्हणून तक्रारी आहेत त्याची दखल घ्यावी व पूर्वीच्या पध्दतीने अवलंब करावा.संबधीत कर्मचाऱ्यावर कार्यवाही करावी.

मुख्यलेखाधिकारी :शिक्षण विभागाच्या संदर्भात जर प्रत्येक शाळेला धनादेश दयायचे झाल्यास ८२ शाळेचे धनादेश काढावे लागते.त्यामूळे ही सिस्टीम ठेवून एकत्रित धनादेश देण्याचे ठरविलेले आहे.संबधीत कर्मचाऱ्याविषयी तक्रारी असेल तर त्यांची बदली करता येईल.

**विषय क्र. ५१ :**

दिनांक ७/७/२००५ रोजे संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र.३४/३ अन्वये औरंगाबाद महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २००५ नुसार नव्याने निर्माण झालेल्या ९८ प्रभागांकरीता मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे कलम २९(१) (अ) नुसार व सन २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या विचारात घेऊन ६ प्रभाग समित्यांची रचना करण्यात आली व त्या प्रभाग सवमितीस अ, ब, क, ड, ई व फ असे संबोधण्यात आले आहे.

महानगरपालिकेतील रस्ते, जलनि:सारण, इमारती, उद्याने, स्मशानुभूमी व स्लम विभागातील देखभाल दुरूस्ती तसेच इतर लोकोपयोगी लहान स्वरूपाची कामे तातडीने व्हावी यासाठी एकूण ६ प्रभागांसाठी ६ वार्ड अभियंत्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक वार्ड अभियंता यांच्या अधिपत्याखाली ३ कनिष्ठ अभियंता व ४ दुय्यम आवेक्षक यांच्या नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

वार्ड अभियंता यांच्याकडे खालील प्रकारची कामे व वित्तीय अधिकार देण्याचे प्रस्तावित आहे.

१) रूपये १०,०००/- (दहा हजर रूपये) मर्यादेच्या देखभाल दुरूस्ती व किरकोळ स्वरूपाच्या कामांचे अंदाजपत्रकांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार तसेच तत्सम कामाचे देयके पारीत करण्याचे अधिकार वार्ड अभियंता यांना राहतील.

२) रूपये ३०००/- (तीन हजर रूपये) पर्यंतच्या रेटलिस्टच्या कामाच्या मंजुरीचे अधिकार वार्ड अभियंता यांना राहतील.

३) वार्ड इंजिनिअर मार्फत रू.५ लक्ष पर्यंतची देखभाल दुरूस्तीची सर्व कामे त्यामध्ये रस्ते दुरूस्ती, ९ मीटर रूंदी पर्यंतच्या रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण, ड्रेनेज, शाळा दुरूस्ती, महानगरपालिका इमारती, स्लम भागातील देखभाल दुरूस्तीची कामे, उद्याने, स्मशानभूमी व खुल्या जगा इत्यादी देखभाल दुरूस्तीची कामे करण्यात येतील.

४) रूपये २५,०००/- ते २,५०,०००/- पर्यंतच्या कामास प्रशासकीय मान्यतेसाठी शहर अभियंता यांच्याकडे वार्ड अभियंता हे त्या त्या विषयाच्या कार्यकारी अभियंता मार्फत अंदाजपत्रके सादर करतील. रू.२.५० लक्ष वरील कामास प्रशासकीय मान्यता व्हावी म्हणुन शहर अभियंता यांच्या मार्फत मा.आयुक्त यांच्याकडे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करण्यात येतील.

५) रू.१० हजर पर्यंतच्या निविदा स्विकृतीनंतर २ टक्के सुरक्षा रक्कम भरून घेणे, त्या कामाचा करारनामा करणे व कार्यादेश देणे याबाबतचे अधिकार वार्ड इंजिनिअर यांना राहतील. करारनामा करीत असतांना अधिनियमातील तरतुदीनुसार मा.स्थायी समितीच्या २ (दोन) सदस्यांच्या स्वाक्षऱ्या करारनाम्यावर घेण्यात येतील. तसेच रू.१० हजर वरील व रू.२५ हजराच्या आतील रक्कमेच्या कामाची निविदा कार्यकारी अभियंता यांच्याकडे सादर करणे, त्यास मंजुरी मिळाल्यानंतर करारनामा आणि इतर कार्यालयीन औपचारीकता वार्ड इंजिनिअर यांच्या स्तरावर करण्यात येईल व या कामाची देयके मंजुरीसाठी कार्यकारी अभियंता यांच्याकडे वार्ड अभियंता सादर करतील.

उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर. वार्ड अभियंता यांची कार्यपध्दती/कार्यप्रणाली व जॅब चार्ट हे शहर अभियंता यांनी ठरवून द्यावेत. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.बारवाल गजनन :वार्ड अधिकारी आणि वार्ड अभियंता हे प्रमुख घटक आहेत. वार्ड कार्यालयात कोणीतरी एकच व्यक्ती प्रमुख असावयास पाहिजे असे माझे मत आहे ते अधिकारी टेक्नीकल असले तरी चालेल मान सन्मान एकाच व्यक्तीचा असतो वार्ड कमेटीचे सभापती सुध्दा तेथे असणार आहे, वार्ड अभियंता यांना १० हजराचे अधिकार देणार आहे ते २५ हजरपर्यत करावे अशी मागणी आहे.३हजरपर्यंत रेटलिस्ट मंजूर करण्याचे अधिकार देणार एवढया रक्कमेत

लहानशे काम सुध्दा होत नाही त्यात वाढ करून ५ हजर करण्यात यावे.वार्ड कमेटीला कोणते अधिकार देणार आहे.

मा.आयुक्त :ॲक्ट नुसार रेटलिस्ट चे ३ हजरचेच अधिकार आहे जे १० हजरचे अधिकार दिले त्यानुसार कामे कशी होतात ते पाहून आणखी २५ हजरापर्यत अधिकार देता येईल.

श्री.रेणूकादास वैद्य :अधिकार दिले वापर होईल इथपर्यत ठिक आहे परंतू वार्ड कार्यालयात ज्या सुविधा दयावयास पाहिजे त्या देण्यात आलेल्या नाही. वार्ड कार्यालय फ मधे दुरध्वनी नाही , तसेच खुर्ची नाही टेबल नाही याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.तरच अधिकार वारता येतील याचा विचार व्हावा. या वार्ड अंतर्गत काही प्रभाग हे दूर आहेत नगरसेवकांना येण्याजण्यासाठी वेळ लागतो त्यामूळे दुरध्वनीवर संपर्क करता येईल किमान मोबाईल तरी उपलब्ध करून देण्यात यावे.

श्री.अजेजज्हागिरदार :वार्ड कार्यालय-फ हे काही वार्डापासून दूरवर आहे पूर्वीचे झोन कार्यालय ६ जेथे होते तेथे स्थलातरीत करावे अशी विनंती आहे.

श्री.दिलीप गायकवाड :२५ हजरांचे कामाचे ए -१ चे टेंडर काढण्यात येते बोर्डवर लावण्यात येते. आता कामे होण्यास उशीर झालेला आहे ए -१ चे टेंडर काढण्यात येवू नये नगरसेवकांच्या शिफारशीनूसार ही कामे करण्यात यावी.

मा.सभापती : आपण केलेली सूचना नियमबाहय आहे.तसे करता येणार नाही.

सौ.लता दलाल :वार्ड अभियंता यांना अधिकार दिले.काही कामे त्यांचेकडून कार्यकारी अभियंता याचे मंजूरीसाठी येतील ती कामेही तातडीची वार्ड कार्यालयात कशी होतील यासाठी प्रयत्न करावे.निवडून आल्यापासून वार्डात आम्ही एक पैशाचेही काम केलेले नाही लोकांच्या अपेक्षा फार मोठया आहेत.त्यास कारण बजेट उशीर मंजूर झाले.वार्ड कार्यालयात च २५ हजराचे कामे कशी तात्काळ करता येईल यासाठी प्रयत्न करावे अशी विनंती आहे.सर्वच अधिकाऱ्याकडे एक संचिका मान्यतेसाठी जणार असेल तर त्यास वेळ लागेल एका कामासाठी एक महिणा तरी लागेल. एवढा उशीर न होता तात्काळ कामे व्हावीत अशी मागणी आहे.शहर अभियंताकडे सर्वच संचिका जणे योग्य होणार नाही.

श्री. अजेजजगीरदार : वार्ड कार्यालयासच अधिकार देण्यात यावे अशी विनंती आहे.मा.आयुक्त अधिकार देवू शकतात. तेथेच संचिका मंजूर झाली पाहिजे

मा.आयुक्त :वसूली बाबत सर्व अधिकार वार्ड अधिकारी यांना दिलेले आहे .शिवाय नवीन रस्ते करण्याचे अधिकार दिलेले आहे.

श्री.बारवाल गजनन :मोचीमोहल्ला हा भाग माझ्या वार्डात येतो तेथे सर्व ड्रेनेज लाईन बंद आहे. ढापे काढावे लागतील म्हणून वार्ड अभियंता यांना सांगितले. तक्रार केली तर वार्ड अभियता हे सांगतात की वार्ड अधिकारी यांना सांगावे लागेल.ते पाहणी करतील रिपोर्ट करतील तेव्हा काम होईल. काम होत नाही म्हणून आपल्या कर्मचाऱ्याना मारहाण करण्यात आलेली आहे. लोकांच्या घरात किडे ,मच्छर झालेले आहे लोक काय करतील.वाउ अधिकारी पाहणी करतील तेंव्हा काम होईल असे सांगितले.

मा.आयुक्त :वार्ड अधिकारी हे फक्त साफसफाईग्चे काम करू शकतात.१०हजराचे अधिकार दिलेले आहे वार्ड अधिकारी काम करतील.

श्री.शंशाक विसपूते :माझ्या वार्डातील एका कामाच्या संदर्भात संचिका मुख्य कार्यालयात आलेली आहे अधिकारी सांगतात अमुक ठिकाणी संचिका गेली तेथे गेलो असता

अधिकारी एकमेकांचे नाव दाखवितात. अशा चकरा माराव्या लागणार नाही काम लवकर होण्यासाठी योग्य तो निर्णय घेण्यात यावा तातडीची कामे ही वार्ड कार्यालयातच झाली पाहिजेही विनंती.

सौ.लता दलाल :गणेशत्सव आलेला आहे लाईटची व्यवस्था झाली पाहिजे तशा आपण सुचना कार्यकारी अभियंता तसेच उपअभियंता यांना कराव्यात हा प्रश्न वादात अडकलेला आहे प्रत्येक वार्डात लाईट नाही लावलेले लाईट ८ दिवस सूध्दा चालू राहत नाही.काही अडचणी असेल तर त्या अधिकारी यांनी सांगाव्या निर्णय घेता येईल.आम्ही तक्रार केली तर वेगळी उत्तरे मिळू नये.उदया पासून लाईटची कामे झाली पाहिजे

कार्य.अभियंता (विद्युत): बऱ्याच ठिकाणी दिवे बंद आहे हे सत्य आहे १ तारखेला मी या विभागाचा चार्ज घेतलेला आहे तेंव्हा पासून अनेकांच्या तक्रारी आहे माहिती घेतली असता खाजगीकरणाचा प्रस्ताव आहे . यामधून देखभाल दुरूस्तीचे काम हे वर्षभर चालणार आहे तोपर्यत खर्च करण्यास हरकत नाही.मा.आयुक्त यांचेशी मी चर्चा केली आहे.मा.आयुक्तांनीही खाजगीकरण होत नाही तोपर्यत देखभाल दुरूस्तीची कामे करण्यास हरकत नाही.काही प्रमाणमधे काम सूरू केलेले आहे. काही सदस्य लगेच उदया काम झाले पाहिजेअसे म्हणतात. परंतू त्यास वेळ लागतो.

श्री.रेणूकदास वैद्य : लगेच काम करावे असे स.सदस्य म्हणत नाही परंतू मी स्वत एक महिण्यापासून अधिकारी यांना भेटत आहे पत्रही दिले कार्यवाही होत नाही.जतीने जवून भेट घेतली आहे नवीन कार्यालय झालेले आहे म्हणून आम्ही एक महिणा काहीही बोललो नाही.मागणी ही महिण्यापासूनची आहे आता उदयाच कार्यवाही व्हावी अशी मागणी आहे.

कार्य.अभियंता (विद्यत). : एक दोन ठिकाणी जरी सोडीयम व्हेपर दिवे बदलावयाचे झाल्यास एक रेटलिस्ट चे काम होते.रेटलिस्टची संख्या वाढत चाललेली आहे म्हणून एकत्रित कार्यवाही केली तर वेळ लागतो.

श्री.रेणूकादास वैद्य :नागरीक अंधारात राहूनये ही आमची भावना आहे . रेटलिस्ट कशा होतील किती होतील हा अधिकार प्रशासनाचा आहे.

मा.सभापती :लाईटच्या बाबतीत मुद्‌दा उपस्थित झालेला आहे. गणपती उत्सव नवरात्र उत्सव हे जवळ आलेले आहे.शहरात रोषणाई मोठया प्रमाणात असणे गरजेचे आहे.या उत्सवाच्या निमित्ताने नागरीकांना अंधारापासून त्रास होवू नये याची दखल घेण्यात यावी.यासाठी मा.आयुक्त यांनी कार्यकारी अभियंता यांना विशेष असे काही आर्थिक अधिकार दयावेत.विषय क्र ५१ च्या बाबतीत सर्वांनी चर्चेत भाग धेतलेला आहे प्रशासकीय बाबी पडताळून पाहिल्यानंतर सर्वाच्या सुचनाची दखल घेवून १०हजर रूपयाचे जे अधिकार दिले आहे .सार्वजनिक बांधकाम खात्याच्या नियमावलीप्रमाणे काम करीत असतो.३ हजराचे जे अधिकार आहे त्यात वाढ करता येणार नाही. नियमाने कार्यवाही आहे.स.सदस्यांचे २५ हजराचे अधिकार देण्याची मागणी केलेली आहे परंतू उपअभियंता यांना हे १० हजराचे अधिकार हे पहिल्यांदाच देण्यात येत आहे.प्रशासनाच्या पध्दतीनूसार दिलेले आहे १० हजराचे काम कशा पध्दतीने करतात त्या कामाची गुणवत्ता कशी असेल अधिकाराचा वापर कसा केला जतो त्यांचा अनुभव घेतल्यानंतर तीन महिण्यानंतर २५ हजराचे अधिकार देण्यासंबधी पून्हा चर्चा करू.आजस्थितीत फक्त १० हजराचे अधिकार

वार्ड अभियंता देण्यात येत आहे.मा.आयुक्त यांना सुचना करण्यात येतात की १० हजराचे काम वार्ड कार्यालयात अंतिम करण्यात आले तर त्या प्रमाणे कार्यवाही करावी वेळ वाचेल व विकास कामे ही तात्काळ होतील.१० हजराचे कामे ही अत्यंत निकडीची कामे असणार आहे. व केलेली कामे ही वार्ड अभियंता यांनी दर आठवडयाला कार्यकारी अभियंता यांचेकडे देणे आवशक आहे.व वार्ड अधिकारी व वार्ड अभियंता यांना जे अधिकार दिले त्या संबधी एक सयुक्तीक बैठक घेवून अधिकारा संबधी त्यांना कल्पना देण्यात यावी अशी सुचना प्रशासनास देण्यात येतात प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेतील रस्ते, जलनि:सारण, इमारती, उद्याने, स्मशानुभूमी व स्लम विभागातील देखभाल दुरूस्ती तसेच इतर लोकोपयोगी लहान स्वरूपाची कामे तातडीने व्हावी यासाठी एकूण ६ प्रभागांसाठी नियुक्ती करण्यात आलेल्या वार्ड अभियंता यांच्याकडे प्रस्तावातील अ.क्र.१ ते ५ मध्ये नमुद करण्यात आलेली कामे व वित्तीय अधिकार देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२ :**

उप आयुक्त (प्रशासन) यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिका ग्रंथालयासाठी मराठी, हिंदी, उर्दू व इंग्रजे साहित्य/पुस्तके खरेदीस्तव पुस्तक खरेदीवर ‘सर्वाधिक सूट’ देणाऱ्या पुस्तक पुरवठा धारकांकडून सर्वाधिक सुट देणारे दर मागविण्यासाठी स्थानिक वृत्तपत्रातून जहिरात प्रकाशित करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या अखेरच्या दिनांकापर्यंत पाच निविदा विकल्या गेल्या आणि निविदा सादर करावयाच्या अखेरच्या दिनांकापर्यंत ५ निविदा प्राप्त झाल्या. ग्रंथालयात व वाचनालयात वर्षभर विविध पुस्तके/साहित्य खरेदी करणेस्तव या निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदाधारकांनी दर्शविलेल्या ‘सर्वाधिक सुट’ संदर्भात सर्व निविदाधारकांशी चर्चा करण्यात आली. चर्चेअंती सर्व साहित्य प्रकारावर निम्ननिर्देशित सर्वाधिक सुट देणेचे पुरवठाधारकांनी मान्य केले.

| अ.क्र. | ग्रंथ प्रकार | निविदा सर्वाधिक सुट | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जीवनग्रंथ वितरण | परिमल प्रकाशन | साकेत प्रकाशन | मिनर्व्हा बुक | योगेश जन संस्था |
| अ | **ललित साहित्य** | | | | | |
| | मराठी | १५% | १५% | १५% | -- | १५% |
| | हिंदी | १५% | १५% | १५% | -- | १५% |
| | उर्दू | १५% | १५% | १५% | -- | १५% |
| ब | **संदर्भ ग्रंथ** | | | | | |
| | मराठी | १५% | -- | १५% | -- | १५% |
| | हिंदी | १५% | -- | -- | -- | १५% |
| | इंग्रजी | -- | -- | -- | १०% | -- |
| | उर्दू | १५% | १५% | १५% | -- | १५% |
| क | **क्रमिक पुस्तके** | | | | | |
| | मराठी | ८% | ८.५% | ९% | १०% | -- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | हिंदी | ८% | ८.५% | ९% | ८.५% | -- |
| | इंग्रजी | -- | -- | -- | १०% | -- |
| | उर्दू | ८% | ८.५% | ९% | ८.५% | -- |
| **ड** | **शासकीलय प्रकाशने** | -- | -- | -- | -- | -- |
| **इ** | **लॉ बुक्स** | ५% | ५% | -- | ५% | ५% |
| **ई** | **दिवाळी अंक** | -- | -- | -- | -- | १२% |

उपरोक्त नुसार पुस्तक खरेदीवर सर्वाधिक सुट देणारे दर दर्शविण्यात आले आहेत. सदरील पुस्तके/वाचन साहित्य याकरीता सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पाचा रू.१५/- लक्ष एवढी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. सदरील तरतूदीच्या अधिन राहून वर्षभरात पुस्तक पुरवठा धारकांकडून मान्य असलेल्या 'सर्वाधिक सुट' दरांपेक्षा कमी नाही या तत्वावर वेळोवेळी पुस्तक खरेदी करणेत येईल.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.विनायक पांडे : महानगरपालिकेत ग्रथपांल म्हणून श्री.संगेकर होते ते निवृत्त झालेले आहेत. आता नवीन नियुक्ती नुसार क्रिडा अधिकारी सौ. संप्रे यांना पाठविण्यात आलेले आहे.ग्रथपाल नेमणूक करतांना त्या व्यक्तीला ग्रथांचे ज्ञान असावे बी-लीब ही पदवी असावी आणि सप्रे मॅडम हया बीपीएड किंवा एमपीएड झालेल्या आहेत या बाबतीत मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

श्री.बारवाल गजनन : मोठे बजेट आपण वाचनालयासाठी ठेवलेले आहे. ज्या वास्तूमधे वाचनालय आहेत त्या वास्तूची अवस्था बरोबर नाही.माझ्या घराच्या समोरच महानगरपालिकेने जगा भूंसपादन करून तेथे हेल्थ सेटंर वाचनालय व सांस्कृतिक सभागृह केलेले आहे. वाचनालयाची अवस्था पाहिली तर बिकट आहे.अतिशय भव्य व देखणी इमारत तयार झाली.परंतु तेथील बाजूचे वातावरण बघीतले तर खुपच खराब झालेले आहे.याकडे सुध्दा लक्ष देणे गरजेचे आहे की जेथे नागरीक वाचनालयात येतात तेथील वातावरण स्वच्छ असावे.याकडे दुर्लक्ष झालेले आहे लक्ष देणेत यावे ही विनंती

मा.सभापती : स.सदस्य श्री.पांडे यांनी जी सुचना मांडली त्या संबधी प्रशासनाने त्या संदर्भात चौकशी करून त्या बाबतीत योग्य निर्णय उपआयुक्त यांनी घ्यावा.अशी सूचना देण्यात येत आहे. तसेच विषयानुसार जे ग्रथांलय वाचनालय आहे तेथील वातावरण स्वच्छ ठेवण्यात यावे वार्ड अधिकारी यांचे मार्फत संपूर्ण परीसर स्वच्छ करावा रंगरगोटी तसेच फर्निचर देण्याची आवशकता असेल तर तसा अहवाल मा.आयुक्ताकडे देण्यात यावा.सर्व वाचनालय चांगले ठेवावे अशा सूचना देण्यात येत असून विषय क्र.५२ मंजूर करण्यात येत आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : ग्रथंपाल या पदे भरण्यासाठी संबधीताकडून अर्ज मागविण्यात आलेले होते.एक वर्ष पूर्ण होत आहे अजूनही जगा भरण्यात आलेल्या नाही.त्वरीत जगा भरण्याची कार्यवाही करावी.

मा.सभापती : ज्या काही ग्रथंपालाच्या जगा रिक्त आहे ही पदे भरती करत असतांना मागे ज्या चुका झाल्या त्या पूढे होवू नये दुरूस्ती करून त्या प्रवर्गातील उमेदवाराला प्राधान्य देवून त्याची काळजी प्रशासनाने घ्यावी.प्रशासनाचे काही अधिकारी दखल घेत

नसतील तर पुन्हा पुन्हा तीच चर्चा होते या बाबतीत मा.आयुक्त यांनी दखल घ्यावी.प्रशासनाची सर्व बाबतीत पकड आहे हे जनतेला दाखवून दयावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका ग्रंथालयासाठी मराठी, हिंदी, उर्दू व इंग्रजे साहित्य/पुस्तके खरेदी करण्याकरीता पुस्तक खरेदीवर सर्वाधिक सुट देणाऱ्या पुस्तक पुरवठा धारकांशी झालेल्या चर्चेअंती ठरल्यानुसार सर्व साहित्य प्रकारावर प्रस्तावात पुरवठा धारकांचे नांवासमोर नमुद 'सर्वाधिक सुट' दरांपेक्षा कमी नाही या तत्वावर वेळोवेळी पुस्तक खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र. ५३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करत आहेत की, महानरपालिकेतील विभागप्रमुख व इतर अधिकाऱ्यांना कार्यालयीन दैनंदिन कामे करतांना सर्व पदाधिकारी, अधिकारी व नागरीकांशी सतत संपर्क साधावा लागतो. याकरीता खालील विभागप्रमुख व अधिकारी यांना त्यांचे नांवासमोर नमूद केल्यानुसार मोबाईल करीता ठराविक रक्कम प्रतिमाह देण्याकरीता मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

| अ.क्र. | विभागप्रमुख/अधिकारी(पद) | मोबाईल करीता प्रतिमाह |
|---|---|---|
| १ | अधिक्षक अभियंता | ७५०/- |
| २ | मुख्य लेखाधिकारी | ७५०/- |
| ३ | उप आयुक्त (प्र) | ७५०/- |
| ४ | उप आयुक्त (म) | ७५०/- |
| ५ | मुख्य लेखापरीक्षक | ७५०/- |
| ६ | करमुल्य निर्धारण अधिकारी | ७५०/- |
| ७ | अतिरिक्त शहर अभियंता | ७५०/- |
| ८ | कार्यकारी अभियंता (ड्रे/वि) | ७५०/- |
| ९ | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) | ७५०/- |
| १० | सहाय्यक संचालक नगर रचना | ७५०/- |
| ११ | आरोग्य वैद्यकीय अधिकारी | ७५०/- |
| १२ | नगर सचिव | ७५०/- |
| १३ | प्रकल्प संचालक | ७५०/- |
| १४ | उप अभियंता (पाणी पुरवठा-१) | ७५०/- |
| १५ | उप अभियंता (पाणी पुरवठा-२) | ७५०/- |
| १६ | उप अभियंता (पा.पु.जयकवाडी स्थळ) | ७५०/- |
| १७ | उप अभियंता (पा.पु.जयकवाडी-यांत्रिकी) | ७५०/- |
| १८ | उप अभियंता (विद्युत-१) | ७५०/- |
| १९ | उप अभियंता (विद्युत-२) | ७५०/- |
| २० | आयुक्तांचे स्वीय सहाय्यक | ७५०/- |
| २१ | सर्व वॉर्ड ऑफीसर व वॉर्ड इंजिनिअर | ७५०/- |
| २२ | लेखाधिकारी | ७५०/- |

करीता उपरोक्त प्रमाणे प्रतिमाह कायमस्वरूपी खर्चास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य : हा विषय मंजूर करण्यास विरोध नाही. यात २०-२२ अधिकाऱ्यांची नांवे आहेत. काही नांवे अनवधानाने राहिली असतील त्यांचा समावेश करण्यात यावा. यात मालमत्ता अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, जकात अधिक्षक यांचा समावेश करावा. सर्वांना सारखा न्याय द्यावा. विभाग प्रमुख यांना २०००/- रू.देण्यात येते. कनिष्ठ अभियंता यांना सर्वात जस्त मेहनत घ्यावी लागते. त्यांचा यात समावेश करावा.

श्री.दिलीप गायकवाड : ७५०/- ऐवजे ८००/- रूपये करण्यात यावे व क.अभियंता, मालमत्ता अधिकारी, प्रशासकीय अधिकारी यांचाही समावेश करावा. अधिकारी दुपारी कार्यालयात असतात त्यांनी मोबाईल ऐवजे कार्यालयीन दुरध्वनीचा वापर करावा.

मा. आयुक्त : हे ग्रुप मोबाईल असणार आहे. महिन्याला ५२५/- असे काही तरी रक्कम फिक्स असणार आहे. आपसात कितीही फोन केले तरी इतकाच खर्च येणार, ग्रुप मोबाईल व्यतिरिक्त जस्त वेळेस फोन करावा लागला तर जस्त खर्च येईल. ७५०/- पेक्षा जस्त खर्च आल्यास तो संबंधीतांनाच भरावा लागेल.

श्री.रेणुकादास वैद्य : क.अभियंता यांचा समावेश करावा. सर्वात जस्त काम त्यांचेकडे असते.

मा. आयुक्त : त्यांची संख्या जस्त आहे. ५-६ लक्ष रूपये खर्च येईल. यात प्रशासकीय अधिकारी व घनकचरा कक्ष प्रमुख यांचा समावेश करणे आवश्यक आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : ५ लक्ष इतर खर्च कमी करून यावर खर्च करावा. परंतु क.अभियंता यांचा यात समावेश करावा.

श्री.गजनन बारवाल : उप अभियंता यांचा समावेश करण्यात यावा.

मा. आयुक्त : हा प्रस्ताव मंजूर केला तर यासाठी १२-१३ हजर रूपये खर्च वाढेल.

सौ. लता दलाल : विचार करावा. आताचे युग हे धावपळीचे आहे.

श्री.अजिजजहागिरदार : सर्व उप अभियंता यांचा यात समावेश करण्यात यावा.

श्री.मिलिंद दाभाडे : आमचा भाग स्लम विभागात येतो. स्लम विभागाचे उप अभियंता यांचेशी आम्हाला संपर्क करावा लागतो. त्यांचाही यात समावेश करावा.

मा. सभापती : हा विषय महत्वाचा असून एकमेकांशी सुसंवाद करून कामकाजयोग्य रितीने व तात्काळ होण्याच्या दृष्टीने क.अभियंता यांचा यात समावेश करून या संदर्भात सर्वांच्या सूचना लक्षात घेऊन किती खर्च येणार आहे, आर्थिक बोज किती वाढणार, कोणाच्या कामाची किती निकड आहे हे सर्व तपासून प्रशासनाने सर्वसमावेशक प्रस्ताव सादर करावा.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ग्रुप मोबाईल द्वारे एकमेकांशी सुसंवाद करून कामकाज योग्य रितीने व तात्काळ होण्याच्या दृष्टीने क.अभियंता यांचा यात समावेश करून या संदर्भात सर्वांच्या सूचना लक्षात घेऊन किती खर्च येणार आहे, आर्थिक बोज किती वाढणार, कोणाच्या कामाची किती निकड आहे हे सर्व तपासून प्रशासनाने सर्वसमावेशक असा प्रस्ताव सादर करावा असे सर्वानुमते ठरले.

''राष्ट्रगिता ''नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद